अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## भारताचा इंग्लंडवर १०६ धावांनी विजय; मालिकेत १-१ अशी बरोबरी

**विशाखापट्टणम** : भारताने दुसऱ्या कसोटीत इंग्लंडला १०६ धावांनी लोळवून ५ सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. भारताकडून दुसऱ्या डावातही जसप्रीत बुमराह आणि आर अश्विनने भेदक गोलंदाजी करत, इंग्लंडच्या फलंदाजाना गुंडाळण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली.

दुसऱ्या डावात बुमराह आणि अश्विनने प्रत्येकी ३-३ विकेट्स घेतल्या. त्यामुळे भारताच्या ३९९ धावांचा पाठलाग करणाऱ्या इंग्लंडचा दुसरा डाव २९२ धावांवर आटोपला. त्यामुळे भारताने चौथ्या दिवशीच ही कसोटी आपल्या खिशात टाकली. जसप्रीत बुमराह याला सामनावीराचा पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. दुसऱ्या कसोटी सामन्यात विजयासाठी इंग्लंडसमोर ३९९ धावांचे आव्हान होते. मात्र, त्यांचा दुसरा डाव २९२ धावांवर आटोपला. इंग्लंडकडून जॅक क्रॉलीने सर्वाधिक %३ धावांची खेळी साकारली. यामध्ये ८ चौकार आणि एक षटकाराचा समावेश होता. त्याशिवाय एकही इंग्लिश फलंदाज मोठी खेळी साकारण्यास अपयशी ठरला. भारताकडून जसप्रीत बुमराह याने या कसोटीत ९ विकेट्स घेतले. पहिल्या डावात त्याने ६ गडी बाद केले. तर, दुसऱ्या डावात तीन गडी बाद केले. रविचंद्रन अश्विनने दुसऱ्या डावात ३ गडी बाद करत बुमराहाला चांगली साथ दिली.



www.surajyadigital.com ■ मंगळवार, दि. ६ फेब्रुवारी २०२४ ■ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १२८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# बापरे...मोदींनी बेदम धुतले, काँग्रेसचे कंबरडेच मोडले

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणजे काँग्रेस पक्षाचे जणू कर्दनकाळच. दहा वर्षांपूर्वी काँग्रेसकडची सत्ता मोदींनी हिरावून घेतली. दुसऱ्या वेळेसही काँग्रेसला सत्तेत तोंड घालू दिले नाही. आता तर अगली बार, चारसौ पार, ही घोषणा मोदींनी केल्यामुळे काँग्रेस पार गर्भगळीत झाली आहे. काँग्रेस नेत्यांची विचारशक्ती खुंटली आहे. मोदींच्या ताकतीपुढे काँग्रेस शारिरीक व मानसिकदृष्ट्या खंगली आहे. अशा स्थितीतीच मोदींनी लोकसभेत इतके बडवले...इतके बडवले की, काँग्रेसचे कंबरडे अक्षरशः मोडून पडले.काँग्रेसवर टीका करताना काँग्रेस खासदारांनी घोषणाबाजी केली पण मोदींच्या आवाजापुढे या घोषणा विरून गेल्या. संयम ठेवत मोदींनी एकेक मुद्यावर काँग्रेसची घालमेल करून टाकली.**

### घराणेशाही देशासाठी घातक

घराणेशाहीचं राजकारण हा सगळ्यांच्या चिंतेचा विषय असला पाहिजे. एखाद्या कुटुंबातले दोन काय दहा लोक प्रगती करत असतील तर मी स्वागत करेन. प्रश्न हा आहे की घराणंच जिथे पक्ष चालवतात. लोकशाहीसाठी हे संकट आहे. काँग्रेस एका कुटुंबातच गुरफटून गेलेला पक्ष. लोकांच्या आशा-अपेक्षा काय आहेत याच्याशी त्यांना घेणंदेणं नाही. काँग्रेसमध्ये कॅन्सल कल्चर निर्माण झालं आहे. काहीही करा, सगळं कॅन्सल. मेक इन इंडिया म्हटलं की काँग्रेस म्हणतं कॅन्सल. आत्मनिर्भर भारत, काँग्रेस म्हणतं कॅन्सल. नवं संसद भवन, काँग्रेस म्हणतं कॅन्सल. या सगळ्या गोष्टी मोदींनी उभ्या केलेल्या नाहीत या देशाच्या आहेत,असे त्यांनी निक्षून सांगितले.



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलेल्या अभिभाषणावर मोदी यांनी सोमवारी लोकसभेत उत्तर दिले. यावेळी त्यांनी विरोधकांच्या टीकेला जोरदार प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, आम्ही ग्रामीण भागातील गरीबांसाठी चार कोटी घरं बांधली, शहरी गरीबांसाठी ८० लाख पक्की घरे बांधली. जर काँग्रेसच्या गतीने गेलो असतो तर या विकासाला १०० वर्ष लागले असते. या कामासाठी पाच पिढ्या लागल्या असत्या. १० वर्षात ४० हजार किलोमीटर रेल्वे ट्रॅकचे इलेक्ट्रिफिकेशन झाले. जर काँग्रेसच्या वेगाने गेलो असतो तर या कामाला ८० वर्ष आणि चार पिढ्या लागल्या असत्या. आम्ही दहा वर्षात १७ कोटी गॅस कनेक्शन दिले, काँग्रेसच्या गतीने या कामासाठी ६० वर्ष लागले असते. तीन पिढ्या धुरात गुदमरल्या असत्या.

ते पुढे म्हणाले, काँग्रेसच्या मानसिकतेमुळे देशाचे खूप नुकसान झाले. काँग्रेसने देशाच्या सामर्थ्यावर कधीही विश्वास ठेवला नाही. त्यांनी स्वतःला शासक मानले आणि जनतेपासून अंतर ठेवून त्यांना लहान समजले. काँग्रेसच्या देशातील नागरिकांबद्दल कसा विचार करतात याबद्दल मी बोललो तर काँग्रेसला राग येतो.

मोदी यांनी २०१४ साली यूपीए दोनच्या काळातील अंतरिम अर्थसंकल्पावेळी तत्कालीन अर्थमंत्र्यांनी केलेले एक विधान वाचून दाखविले. त्यावेळची भारताची अर्थव्यवस्था जगातील ११ व्या क्रमाकांवर आहे. जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होण्यासाठी यूपीएने २०४४ चे लक्ष्य ठेवले होते. पण आम्ही तिसऱ्या टर्ममध्येच हे करून दाखविणार आहोत. जर ११ क्रमाकांवर गेल्यावर तुम्हाला त्यावेळी आनंद झाला होता, तर आज तिसऱ्या क्रमाकांवर गेल्यावरही तुम्हाला का आनंद होत नाही?असा प्रश्नही त्यांनी काँग्रेसला विचारला

**नेहरू म्हणाले होते, भारतीय लोक आळशी :** १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून तत्कालीन पंतप्रधान नेहरूंनी जे भाषण केले होते,त्यातील एक मुद्दा मोदींनी सांगितला. भारतात अधिक मेहनत करण्याची सवय नाही. आम्ही इतके काम नाही करत, जेवढे युरोप, जपान, रशिया, अमेरिका किंवा चीनमधील लोक करतात. हे समजू नका त्यांचा समाज चमत्काराने विकसित झालेला नसून मेहनत आणि हुशारीच्या बळावर विकसित झाला आहे, म्हणजे नेहरु भारतीय नागरीकांना आळशी समजत होते. भारतीय कमी अक्कल असलेले आहेत, असे नेहरुंचे म्हणणे असल्याचे मोदी म्हणाले.

**मोहब्बत की दुकान :** मोदी यांनी राहुल गांधींच्या 'मोहब्बत की दुकान' शब्दावर टीका केली. आम्ही घराणेशाहीची चर्चा करतो कारण जो पक्ष कुटुंब चालवते, कुटुंबातल्या लोकांनाच प्राधान्य देते. कुटुंबच सगळे निर्णय घेते त्याला आम्ही घराणेशाही म्हणतो. लोकशाहीत हे योग्य नाही. राजकारणात एका कुटुंबातले दहा लोक आले तरीही काहीच प्रश्न नाही. पण ते त्यांच्या प्रतिभेवर आणि लोकांनी दिलेल्या मतांवर निवडून आलेले हवेत, लादलेले नकोत असेही मोदी म्हणाले.

**काँग्रेसने तिरस्कार पसरवला :** काँग्रेस तिरस्कार पसरवण्याचंच काम करतं आहे. राष्ट्रपतींनी विकसित भारताच्या रोड मॅपवर चर्चा केली. अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभही त्यांनी सांगितले. भारताच्या मजबूत अर्थव्यवस्थेचं जग कौतुक करतं आहे. जी२० समिटमध्ये जग आपल्या देशाबाबत काय विचार करतं हे सगळं जगाने पाहिलं आहे. आज आपली अर्थव्यवस्था मजबूत आहे म्हणून आपला देश अर्थव्यवस्थेची प्रगती साधतो आहे. त्यामुळेच भारत जगातली क्रमांक तीनची अर्थव्यवस्था असलेला देश होणार आहे. ही मोदींची गॅरंटी आहे,असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## अकलूजच्या अपार्टमेंटमध्ये ७ लाखांची घरफोडी

**सोलापूर** : अपार्टमेंटच्या तिसऱ्या मजल्यावर राहणाऱ्या एका इसमाच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील रोख रकमेसह ७ लाख ३० हजाराचे दागिने पळविले. ही चोरी शनिवारी अकलूज येथील नवीन एसटी स्टँडजवळ असलेल्या पार्वती अपार्टमेंट मध्ये शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली.



यासंदर्भात मल्हारी शंकर इंगळे (रा. पार्वती अपार्टमेंट) यांनी अकलूज पोलिसात फिर्याद दाखल केली. ते ३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास कुलूप लावून बाहेर गेले होते. दोन तासांनी परतल्यानंतर त्यांना घराचे कुलूप मोडल्याचे आढळले. आज जाऊन पाहणी केली असता लाकडी कपाटामधील ५ लाख ३० हजार रुपये रोख, ३५ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि इतर चांदीच्या वस्तू चोरीस गेल्याचे आढळून आले. त्यानंतर इंगळे यांनी अकलूज पोलिसात फिर्याद दाखल केली . तपास सहाय्यक निरीक्षक पवार करीत आहेत.

## महिलेचे घर फोडले; दागिने गायब

**सोलापूर** : बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने एका महिलेच्या घरातून रोख रकमेसह ७३ हजार रुपयाचे दागिने पळविले. ही चोरी माळकवठा (ता.दक्षिण सोलापूर) येथे घडल्याचे उघडकीस आले.



या संदर्भात जगदेवी अर्जुन कट्टीमनी (रा. माळकवठा) यांनी मंद्रूप पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या गेल्या सोमवारी सकाळी घराला कुलूप लावून परगावी गेल्या होत्या. काल रविवारी परतल्यानंतर त्यांना घराचे मोडल्याचे दिसून आले. चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडून पेटीतील १९ ग्रॅम सोन्याचे दागिने, १० हजार रोख आणि चांदीचे वस्तू चोरून नेले. असे फिर्यादीत नमूद आहे. हवालदार गुंडाळे तपास करीत आहेत.

## टेम्पोच्या धडकेने दुचाकीवरील एकजण ठार

**सोलापूर** : जालीहाळ (ता.मंगळवेढा) येथे वेगाने जाणाऱ्या टेम्पोच्या धडकेने दुचाकी वरील शिवाजी कृष्णा कांबळे (वय ५८ रा. जालीहाळ, ता.मंगळवेढा) हे मयत तर भारत व्हरगल हे गंभीर जखमी झाले. हा अपघात रविवारी सायंकाळच्या सुमारास घडला.



याप्रकरणी मंगळवेढाच्या पोलिसांनी अपघातानंतर फरार झालेल्या केए२२-ए-८८६७ या क्रमांकाच्या टेम्पो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. शिवाजी कांबळे हे भारत व्हरगल यांच्या दुचाकीच्या पाठीमागे बसून हिवरगाव ते जालीहाळच्या दिशेने निघाले होते. दुपारी दोन वाजेच्या सुमारास शेंडगे यांच्या घराजवळ हाजापूर ते भाळवणीच्या दिशेने जाणारा वरील क्रमांकाचा टेम्पो धडकल्याने हा अपघात घडला.अशी नोंद मंगळवेढा पोलिसात झाली . फौजदार शेख पुढील तपास करीत आहेत

# पोलीस आयुक्तसाहेब; आपल्या सोलापुरात कायद्याचे राज्य आणा हो!

**घरफोड्या, अवैध धंदे, बेशिस्त वाहतूक, डान्सबार अन् दुचाकी चोऱ्यांचे आव्हान**

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

ऐतिहासिक पार्श्वभूमी तसेच कर्नाटक आणि आंध्रप्रदेश या राज्याच्या सीमावर्ती भागाशी कनेक्टिव्हिटी असलेल्या शिवाय गुन्हेगारी विश्वामुळे राज्याच्या पटलावर नेहमी चर्चेत





राहिलेल्या हुतात्मा नगरी अर्थात सिध्दरामेश्वरांच्या पावन नगरी सोलापुरात नवे पोलीस आयुक्त म्हणून एम.राजकुमार यांनी सोमवारी पदभार घेतला. तमाम सोलापूरकरांच्यावतीने त्यांचे पहिल्यांदा मनस्वी स्वागत आणि सोलापुरातील कायदा अन् सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सोलापूरच्या पोलीस दलाचे कॅप्टन म्हणून इथल्या कारकिर्दीसाठी त्यांना खूप खूप शुभेच्छा.

पोलीस प्रशासनातील विविध वरिष्ठ पदांवरच्या तगड्या अनुभवाची शिदोरी पाठिशी असलेल्या नूतन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांचे धडाकेबाज कर्तृत्व समोर आहे. त्यांनी आपल्या स्वतःकडील कार्यकौशल्यातून आजवर प्रत्येक नेमणुकीच्या ठिकाणी चुणूक दाखविली. त्यातून त्यांची नेमणूक आणि कार्यकिर्द पर्यायाने त्यांची कामगिरी आजवर चर्चेत राहिली. तथापि, सोलापूरचे पोलिसिंग सांभाळताना आयुक्त एम. राजकुमार यांच्यासमोर अनेक आव्हाने आहेत.

### अपेक्षाभंग होणार नाही अशी ईच्छा

पोलीस उपयुक्त आणि पोलीस आयुक्त या दोन्ही पदावर कार्यरत राहिलेल्या आणि सोलापूरची खडानखडा माहिती असलेल्या डॉ.राजेंद्र माने यांच्याकडून कायदा आणि सुव्यवस्थेच्या सर्वच आघाड्यांवर सोलापूरकरांचा पुरता भ्रमनिराश झाला. मात्र, तो भ्रमनिराश विसरण्यास भाग पाडणारे उत्कृष्ट काम नवे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांना करावे लागणार आहे. सोलापूरकरांना पोलिसांबद्दल विश्वास वाटेल, असं काम पोलीस प्रशासनाच्या दृष्टिकोनातून व्हायला हवं.

ही आव्हाने लिलया पेलताना सोलापूरकरांना कायदा अन् सुव्यवस्था अबाधित राखण्याचा विश्वास द्यावा लागणार आहे. कारण माजी पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्याकडून मोठा अपेक्षाभंग त्याबाबतीत झाला, असे इथले समाजमन बोलते. कायदा अन् सुव्यवस्थेची चांगली घडी ठेवून ते सोलापूरकरांचे मन जिंकू शकले नाहीत, हे या नगरीतील नागरिकांकडून वास्तव मांडले जाते. पोलीस आयुक्तालयाची मोठी हद्द, सात पोलीस स्टेशन या अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्थेची बूझ राखताना घरफोड्या आणि दुचाकी चोऱ्यांच्या घटना यावर नवीन आयुक्तांना 'अंकुश' आणावा लागणार आहे.

घरफोड्यांच्या तपासाच्या अनेक फायली प्रलंबित आहेत, त्याचा निपटारा करणे आणि सोलापूरकरांना चोरीच्या घटना घडणार नाहीत, याबाबत आश्वस्त करणे, दिलासा देणे महत्त्वाचे ठरणार आहे. सोलापूर शहरात बोकाळलेल्या दारू, जुगार, यासह सर्वच अवैध धंद्यांचा बिमोड करण्याची जबाबदारी नव्या पोलीस आयुक्तांवर असणार आहे. अवैध धंद्ये बंद होत नसल्यामुळे पोलिसांबद्दल सोलापूरकरांच्या मनामध्ये जी नकारात्मकता आहे, ती पुसण्याचे काम नव्या पोलीस आयुक्तांना करावे लागणार आहे. पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत धथिंग करून त्या त्या परिसरात लोकांच्यामध्ये दहशत माजवून कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्न निर्माण करणाऱ्या पर्यायाने गुंडगिरी करणाऱ्या दादा, मामा काका, बॉस, भाई आदींच्या मुसक्या आवळणे, हे काम नव्या आयुक्तांना तातडीने करावे लागणार आहे. अशा संबंधितांच्या मुसक्या आवळणे ही तर नव्या आयुक्तांची खासियतच आहे. त्यामुळे हे काम त्यांना जड जाणार नाही हे विशेष आहे.



### डान्सबारवर कायमच्या बंदीचा हवा अजेंडा

बकाल आणि उद्ध्वस्त सोलापूर शहराच्या सामाजिक चिंतनाचा विषय बनलेल्या येथील डान्सबार बंदीचा नव्या पोलीस आयुक्तांचा अजेंडा हवा. अनेकांचे संसार देशोधडीला लागण्याबरोबरच कैकजणांना यमसदनी जाण्यास भाग पडलेल्या पोलीस आयुक्त हद्दीमधील डान्सबार बंदी कायमची व्हायला हवी. सोलापूरकरांच्या या आग्रही मागणीला प्रतिसाद देत, नव्या आयुक्तांनी शहरातले ऑर्केस्ट्राच्या नावाखाली चालणारे सर्वच अवैद्य डान्सबार बंद करायला हवेत.यापूर्वीच्या पोलीस आयुक्तांकडून डानसबारला 'अभय' राहिल्याची चर्चा आजवर होत राहिली.



### वाहतूक व्यवस्थेला शिस्त, कळीचा मुद्दा

शहराची लोकसंख्या साधारण चौदा लाख आहे. मात्र शहरात वाहतूक व्यवस्थेची पूरती वाट लागली आहे. वाहतुकीला कोणतीही शिस्त नाही याचा फटका शहरवासीयांना बसतो आहे. बेशिस्त वाहतुकीमधून नागरिकांचे हकनाक बळी जात आहेत. नव्या आयुक्तांना त्यावर ठोसपणे भूमिका घ्यावी लागणार आहे. बेशिस्तीच्या वाहतुकीमुळे सोलापूर शहराचे नाव बदनाम होत आहे. सोलापूरची प्रतिमा सुधारण्यासाठी नव्या आयुक्तांनी व्हिजन ठेवून काम करणे आवश्यक आहे.



### अवैध धंद्यांवर नियंत्रण कसे आणणार?

मोठी लोकसंख्या असूनही पुरेसा रोजगार नसल्यामुळे युवक दिशाहिन झाले आहेत. त्याचा फायदा घेऊन अवैध धंद्यांची वाढ फोफावली आहे. स्टेशन परिसरात रात्रीच्या वेळी पोलीस चौक्यांच्या जवळच लुटमार, जुगार, चालू आहे. जुगारी अनेक प्रवाशांना लुटत असल्याने शहराचे नाव बदनाम होत आहे.



### दुचाकी चोरीच्या घटना चिंताजनक

दारू पिऊन दंगा घालणारे, वाढत्या दुचाकी चोऱ्या याबाबतीतही नियंत्रणाची गरज आहे. गेल्या महिनाभरात दुचाकीचोरीच्या घटना पाहता हा चढता आलेख चिंताजनक आहे. घरासमोर, कार्यालयांसमोर लावलेली गाडी पुन्हा दिसेल का नाही, अशी चिंता सामान्यांना पडत आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



स्वप्नरंजन !!!

| कल्याण |
|---|
| 137-16-268 |

| मुंबई |
|---|
| 589-28-477 |

# बिहारची रणनीती

जुन्या काळातील राजकीय नेते आपापल्या पक्षाशी एकनिष्ठ असत. बंडखोरी क्वचितच होत असते. पक्षाकडून जो आदेश येईल, तो शिरसावंद्य मानण्याचा प्रामाणिकपणा त्यावेळी होता.बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार हेही जुन्या पिढीतील नेते. विशेष करून ते समाजवादी देखील आहेत. १९४७ मध्ये विद्यार्थी दशेतून राजकारणात प्रवेश केलेल्या नितीश कुमार यांनी आतापर्यंत एकूण पाच वेळा भूमिका बदलली. जनता दलाचा भाग असताना १९९४मध्ये नितीश कुमार यांनी पहिल्यांदा पक्ष बदलला. जनता दल सोडल्यानंतर नितीश यांनी जॉर्ज फर्नांडिस आणि लालन सिंग यांच्याबरोबर मिळून १९९४ मध्ये समता पक्षाची स्थापना केली आणि १९९५ च्या विधानसभा निवडणुका डाव्या पक्षांबरोबर लढले. १९९६ मध्ये नितीश कुमार यांनी दुसऱ्यांदा भूमिका बदलली. नितीशकुमार यांचा एनडीएबरोबरचा प्रवास २०१० पर्यंत सुरू होता. नरेंद्र मोदींना पंतप्रधानपदाचा चेहरा म्हणून पुढे आणल्यावर नितीश कुमार एनडीएपासून वेगळे झाले आणि २०१४ची लोकसभा निवडणूक एकट्याने लढवली. या काळात नितीशकुमार यांनी दोन जागा जिंकल्या होत्या. फक्त एक वर्षानंतर नितीश कुमार यांनी २०१५ची विधानसभा निवडणूक महाआघाडीबरोबर लढवली आणि जिंकली. याच काळात नितीशकुमार बिहारचे मुख्यमंत्री आणि तेजस्वी यादव उपमुख्यमंत्री झाले.एका घोटाळ्यात तेजस्वी यादव यांचे नाव समोर आल्यावर नितीश कुमार यांनी चौथ्यांदा पलटी मारत भाजपबरोबर सरकार स्थापन केले. २०२२ मध्ये नितीश कुमार पुन्हा एकदा पक्ष बदलून महाआघाडीत सामील झाले. नितीशकुमार एका पक्षाला सोडून दुसऱ्या पक्षात सामील होण्याची ही पाचवी वेळ होती. २०२२ नंतरही नितीश महाआघाडीबरोबर होते आणि आता ते पुन्हा भाजपमध्ये सामील झाले आहेत. खरे तर नितीश कुमारांकडे आधी राजकारणातील एक आदर्श व्यक्ती म्हणून पाहिले जात होते, परंतु आता सगळी परिस्थितीच बदललीय. अगदी त्या उलट राजकीय विश्वासार्हता गमावलेला नेता, सतत राजकीय भूमिका बदलणारे नेते म्हणून नितीश कुमारांकडे पाहिले जाते. नितीश कुमारांच्या भाजपमध्ये परत आल्याने मोदींना लोकसभा निवडणुकीत बिहार पुन्हा जिंकण्याची चांगली संधी चालून आली आहे. एनडीएने २०१९ मध्ये राज्यातील ४० लोकसभेच्या जागांपैकी ३९ जागा जिंकल्या होत्या. २०२२ मध्ये महागठबंधन स्थापन करण्यासाठी नितीश यांना २०२०च्या विधानसभा निवडणुकीत एनडीए युतीबरोबर जाण्याचा जनादेश मिळाला होता. बिहारमधील तीन प्रमुख पक्षांपैकी नितीश यांचा पक्ष सर्वात लहान असला तरी आरजेडी आणि भाजप ज्या पक्षांशी ते जुळवून घेतात, ते बिहारमध्ये सरकार बनवतात. नितीश-भाजप युती २०१० च्या विधानसभा निवडणुकांप्रमाणेच येत्या निवडणुकीत उच्च जाती, कुर्मी, अत्यंत मागासवर्गीय, महादलित आणि मुस्लीम या जातींच्या लोकांच्या मतांच्या ध्रुवीकरणासाठी प्रयत्न करतील. नितीश मुख्यमंत्री म्हणून सत्तेत असतानाही त्यांच्या पक्षाची घसरण होत आहे, २०१० मध्ये ११५ जागा, २०१५ मध्ये ७१ आणि २०२० मध्ये ४३ जागा मिळाल्या आहेत. नितीश यांनी कठोर राजकीय निर्णय अन् फायद्याचे संतुलन साधत घर वापसी केली खरी पण ते आणखी एक वर्ष (२०२५ मधील विधानसभा निवडणुकीपर्यंत) मुख्यमंत्रिपदी राहू शकतात. कारण २०२४ मध्ये केंद्रात भाजपच्या विजयानंतर ते कठीण सिद्ध होऊ शकते. २०२५ नंतर भाजपने नितीश यांना मुख्यमंत्री म्हणून आणखी एक टर्म परवानगी देण्याची शक्यता नाही.सध्या पंतप्रधान मोदींची लोकप्रियता ही प्रचंड आहे, त्यामुळे बिहार युती पुढील वर्षी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत भाजपच्या फायद्याची ठरण्याची शक्यता आहे. नितीश बरोबर आल्यामुळे आता भाजपाला बिहारमधील जातीची गणित सोडवणं सोपं जाणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नितीशच्या बाहेर पडण्याने इंडिया आघाडीला धक्का बसला आहे, कारण इंडिया आघाडीचे जेडी(यू) प्रमुख आरंभकर्ते होते, शिवाय लोकसभा निवडणूक आता नितीश यांना भाजप युतीबरोबर लढावे लागणार असल्याने त्यांच्या समोर इंडिया आघाडीतीलच नेते असणार आहेत. लालू प्रसाद यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या डोक्यावर घोटाळ्यांच्या प्रकरणांची टांगती तलवार पाहता सत्तेची समीकरणे बदलल्याने आरजेडीची आक्रमकता कमी होऊ शकते.



राजकीय

# ‘राम’ राहिला आहे का?

बिहारमध्ये जनता दल युनायटेडचे नेते नितीश कुमार यांनी पुन्हा एकदा राजकीय समीकरणे बदलली आणि ते एका दिवसात माजी-आजी मुख्यमंत्री बनले. २८ जानेवारीला त्यांनी पुन्हा एकदा भाजपशी हातमिळवणी केली आहे. २०१४-१५ चा काळ वगळता २००५पासून त्यांचा हाच खेळ सुरू आहे. आता येत्या लोकसभा निवडणुकीत बिहारमधील मतदार किती सुज्ञपणा दाखवतात, हे समजेल.

वास्तविक नितीश कुमार यांनी २०२२ मध्ये भाजपची साथ सोडल्यानंतर यावर्षीच्या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपला धूळ चारण्याचा निर्धार करत विरोधकांची मोट बांधण्यासाठी हालचाली सुरू केल्या. विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या गाठीभेटी घेण्यास सुरुवात केली. या विरोधकांची पहिली बैठक त्यांनी बिहारमधील पाटणा येथे आयोजित केली होती. त्यातूनच विरोधकांची आघाडी असलेली ‘इंडिया’ अस्तित्वात आली, पण याची सूत्रे अपेक्षेप्रमाणे काँग्रेसने हाती घेतली आणि आघाडीत धुसफूस सुरू झाली. प्रमुख नेत्यांच्या नावाची चर्चा रंगली, पण त्यात नितीश कुमार यांचे नाव मागे पडले. आपल्याला पंतप्रधानपदाची इच्छा नाही, असे कितीही ते म्हणत असले तरी, अशा सुप्त इच्छा लुप्त होत नाहीत हेच वास्तव आहे. ज्यांच्या राजकारणाचा परीघ एखाद्या राज्यापुरताच आहे, असे कैक नेते मुख्यमंत्रिपदाची आकांक्षा बाळगून आहेत. नितीशकुमार तर मोठे राजकारणी आहेत, हेही लक्षात घेणे गरजेचे आहे. इंडियामध्येदेखील ज्यांच्यावर डोळे झाकून विश्वास टाकावा, असे कोण आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा करिष्मा चालला नसता आणि भाजपला सत्ता स्थापन करण्यासाठी अन्य पक्षांची मदत लागली असती, तर याच विरोधकांच्या आघाडीतील अनेक पक्षांनी पुढे येत समर्थन दिले असते. माजी पंतप्रधान दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये यातील अनेक पक्ष सहभागी झाले होते, हे कसे विसरता येईल? हे पक्ष त्यावेळी काँग्रेसविरोधात भाजप आघाडीत होते आणि आता भाजपविरोधात काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीत आहेत.

**सध्या राजकारण एवढे गढूळ झाले आहे की, यात हात घातला तरी हाताला काही लागणार नाही, अशी स्थिती आहे. २२ जानेवारीला अयोध्येत राम मंदिर उभे राहिले. त्या अनुषंगाने श्रीरामाचा जयघोष होत आहे, पण प्रभू रामचंद्राचे इतर आदर्श तर जाऊ द्या, पण किमान एक वचनी, एक वाणी या आदर्शांना राजकारण्यांकडून सर्रास हरताळ फासलेला दिसत आहे. त्यामुळे ‘रामराज्या’च्या कितीही वल्गना केल्या तरी, त्यापासून आपण सर्वच कोसो दूर असल्याची कल्पना आता सर्वांनाच येत चालली आहे. गरिबांबद्दलची कणव, स्त्रीदाक्षिण्य, विद्येबद्दल आदर, विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा विचार हा कवडीमोलाचा झाला आहे. जनतेच्या या प्रश्नांच्याच आगीवर पुढेही राजकारण्यांची पोळी भाजली जाणार आहे. त्यामुळे मूळ परिस्थितीत बदल होणे गरजेचे आहे. यासाठी केवळ प्रभू श्रीरामाचा जयजयकार नको, तर त्याबरोबर जागरूकताही आवश्यक आहे. येणाऱ्या निवडणुका म्हणजे एक संधी आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.**

विरोधकांची एकजूट करण्याचा प्रयत्न २०१९च्या लोकसभा निवडणुकींच्या वेळीही झाला, पण प्रत्यक्षात निवडणुकांच्या वेळी काहीच झाले नाही. २०२४च्या निवडणुकांपूर्वी विरोधकांनी एक पाऊल पुढे टाकत आघाडी तरी स्थापन केली आहे, पण पश्चिम बंगाल, दिल्ली आणि पंजाबमध्ये या आघाडीला सुरुंग लागला आहे. तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालमध्ये स्वबळावर लढण्याचा मनसुबा जाहीर केला आहे, तर अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पार्टीनेदेखील दिल्ली आणि हरयाणात एकट्यानेच निवडणूक लढविण्याचे जाहीर केले आहे. त्यात काँग्रेसची खुमखुमीदेखील अद्याप कमी झालेली नाही. मध्यप्रदेश, राजस्थान, तेलंगणा आणि उत्तराखंडमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये इंडियाचा प्रयोग करून बघायला हरकत नव्हती. ती एक लिटमस टेस्ट ठरली असती, पण यासाठी कोणीच पुढाकार घेतला नाही. तर मध्यप्रदेशातील निवडणुकीत इंडियातील घटक पक्ष असलेल्या समाजवादी पार्टीशी युती करण्याचे काँग्रेसने झिडकारले. परिणामी तेलंगणाचा अपवाद वगळता इतर तीन राज्यांमध्ये भाजपचे कमळ फुलले. एकूणच, या आघाडीत सहभागी असलेल्या प्रत्येक पक्षाचा आपापला अजेंडा आहे आणि त्यानुसारच ते चालतात. वाजपेयी यांच्या कारकिर्दीत हेच झाले होते आणि इंडियाच्या बाबतीतही हेच होणार आहे.



राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये मात्र तशी स्थिती नाही. भाजपने, विशेषत: पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व सूत्रे आपल्या हाती ठेवली आहेत. त्यामुळेच आपल्या अजेंड्याबद्दल आग्रही असणारे बडे पक्ष राष्ट्रीय लोकशाही आघाडीतून बाहेर पडले. हेच अटल बिहारी वाजपेयी यांना जमले नाही, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. भाजपचीही ध्येय-धोरणे बदलत चालली आहेत, एकेकाळी ‘शतप्रतिशत भाजप’ अशी घोषणा देण्यात आली होती. भाजपने त्यात बदल केल्याचे अधिकृतपणे जाहीर केले नसले तरी, भाजप आणि फक्त भाजप’ असा नवा नारा या पक्षाचा झाला आहे, हेच अलीकडच्या काळातील घडामोडींवरून दिसते. एखाद्या राज्यात भाजपव्यतिरिक्त दुसऱ्या पक्षाला बहुमत मिळाले तरी, कालांतराने भाजपचाच बडा नेता त्या राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेताना दिसतो. एखाद्या निवडणुकीनंतर त्रिशंकू स्थिती निर्माण झाली तरी, सरकार भाजपच्या नेतृत्वाखालीच स्थापन होते, हेच आता आपण सर्व पाहात आहोत. २०१७ मधील गोवा आणि मणिपूरमधील निवडणूक असो की, २०१८ची मध्य प्रदेश निवडणूक. हेच चित्र पाहायला मिळाले. यासाठी साम वगळता, दाम, दंड, भेद यांचा मुक्तपणे वापर सुरू आहे.

प्रसिद्ध लेखक व. पु. काळे यांनी म्हटले आहे की, ‘रामायण’ म्हणजे आदर्शवाद. तिथे मस्तक मनापासून किंवा नाटकीपणाने झुकवले की संपले. सगळ्या देशाची स्वातंत्र्यानंतर लंका झाली असली तरी, पांढऱ्या टोपींने ‘रामराज्य’ डिक्लेअर केले की काम झाले. प्रभू श्रीरामचंद्रांनी ‘बालवयात जसा चंद्र हवा’ म्हणून हट्ट धरला होता, त्याप्रमाणे रामायण चंद्रासारखे शीतल आहे. आदर्श प्रत्यक्ष आचरणात आणायचे नसले की शीतलच असतात. ‘तत्त्व, निष्ठा, चरित्र आणि आदर्श’ यांचा वारंवार उदोउदो करणे सोपे असते, पण प्रत्यक्ष अंमलात आणण्याची पात्रता किती राजकारण्यात राहिली आहे?

**- मनोज जोशी.**

टुडेज् ब्लॉग

# पाकिस्तानी कलाकार हवेत कशाला?

साधारणतः १०-१२ वर्षांपूर्वी समस्त वाहिन्यांवर ’रिऍलिटी शोज’चे पेव फुटले होते. यामध्ये गाण्याचे आणि नृत्याचे कार्यक्रम अधिक प्रमाणात असत. या प्रत्येक कार्यक्रमात किमान एक तरी स्पर्धक पाकिस्तानी असे. अंतिम फेरीपर्यंत या स्पर्धकाला स्पर्धेमध्ये ठेवले जात असे. या पाकिस्तानी गायकांना लघुसंदेशाद्वारे मतदान करण्यामध्ये भारतीय तरुण-तरुणी आघाडीवर असत. पाकिस्तान एकीकडे भारताच्या सीमेवर कुरापत्या काढत होता.

भारतविरोधी दहशतवादी कारवाया करण्याचे नियोजन करत होता, तर दुसरीकडे भारतीय कलारसिक मंडळी ’कलेला सीमेचे आणि धर्माचे बंधन नसते’, ’कला दोन देशांना जोडणारा दुवा आहे’ असे सांगत पाकिस्तानी कलाकारांसाठी पायघड्या अंथरत होती. केवळ ’रिऍलिटी शो’ नव्हे, तर हिंदी चित्रपटांत गाणी गाण्यासाठी आणि काम करण्यासाठीही पाकिस्तानी कलाकारांना निमंत्रित करण्यात येऊ लागले. माहिरा खान, फवाद खान, आतिफ असलम, अली जफर, जावेद शेख, राहत फतेह अली खान यांसारखी कलाकार मंडळी भारतात येऊन लक्षावधी रुपये कमावू लागली. भारतात यांचे लाखोंनी फॅन फॉलोअर्स तयार होऊ लागले. येथील काही राष्ट्रप्रेमी संघटना, राजकीय मंडळी पाकिस्तानी कलाकारांच्या भारतातील वाढत्या प्रभावाच्या विरोधात उभी ठाकली होती; मात्र भारतीयांचे देशप्रेम या कलाकारांप्रतीच्या प्रेमापुढे फिके पडत होते.

२०१६ मध्ये उरी येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर मात्र पाकिस्तानविरोधात समस्त देशवासीयांमध्ये संतप्त भावना निर्माण झाली आणि पाकिस्तानी कलाकारांना त्यांच्या देशात परत पाठवण्याची मागणी जोर धरू लागली. अखेर त्याच वर्षी पाकिस्तानी कलाकारांवर बंदी घालण्यात आली. भारतात आलेल्या पाकिस्तानी कलाकारांना गाशा गुंडाळून मायदेशी परतावे लागले.



भारतीय सिनेसृष्टीशी संबंधित संस्थांसह, निर्माता संघटनांना, पाकिस्तानी सिनेकलाकार, गायक, संगीतकार, गीतकार आणि तंत्रज्ञांबरोबर काम करण्यास कायमस्वरूपी मज्जाव करण्याचा आदेश केंद्र सरकारला देण्याच्या मागणीसाठी चित्रपटसृष्टीतील फैझ अन्वर कुरेशी यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका प्रविष्ट केली; मात्र ’देशभक्ती सिद्ध करण्यासाठी शेजारील देशाच्या कलाकारांशी शत्रुत्व बाळगण्याची आवश्यकता नाही. पाकिस्तानी कलाकारांना विरोध ही देशभक्ती नव्हे’ अशी टिप्पणी करत न्यायालयाने १९ ऑक्टोबर २०२३ ला ही याचिका फेटाळली. पुढे सर्वोच्च न्यायालयानेही मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयावर री ओढली. त्यामुळे पाकिस्तानी कलाकारांना पुन्हा भारतात येण्याचा मार्ग मोकळा झाला. न्यायालयाच्या याच निर्णयाचा आधार घेऊन संगिनी ब्रदर्सनी आपल्या ’लव्ह स्टोरी ऑफ ९०’ या आगामी चित्रपटासाठी पाकिस्तानी गायक आतिफ अस्लम याला पाकिस्तानातून बोलावण्याचा निर्णय घेतला आहे. भारतात येऊन लाखो रुपयांची बिदागी घेणारे पाकिस्तानी कलाकार आणि गायक पाकिस्तानात जाऊन भारत विरोधातील रोष वेळोवेळी प्रकट करत असतात. भारताने काश्मीरमधून ३७० कलम हटवले तेव्हा याच आतिफ अस्लमने सरकारचा निर्णय काश्मिरी जनतेवरील अन्याय असल्याचे सांगत निषेध व्यक्त केला होता. राहत फतेह अली खान यांनी भारतात येऊन अनेक हिंदी चित्रपटांसाठी गाणी गायली आहेत. ’भारतीय कलाकार आपली लग्ने भारताबाहेर जाऊन करतात. कारण त्यांना आपल्या लग्नात पाकिस्तानी गायकांकडून गाणी गाऊन घ्यायची असतात’ असे नुकतेच विधान करून त्यांनी भारतीय कलाकारांचा अवमान केला.

आतिफ अस्लमच्या गाणे गाण्यासाठी भारतात येण्यासंदर्भात उलट सुलट प्रतिक्रिया सध्या सामाजिक माध्यमांवर उमटत आहेत. पाकच्या कुरापतींवर आळा घालण्यासाठी भारतीय सैन्य दिवसरात्र डोळ्यांत तेल घालून सीमेचे रक्षण करत असते. पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांत आजतागायत शेकडो सैनिक आणि निरपराध नागरिक नाहक बळी गेले आहेत. असे असताना हिंदी चित्रपटसृष्टीने पाकिस्तानी कलाकारांना बोलावणे योग्य नसल्याचे मत भारतीय तरुण वर्ग व्यक्त करत आहे. दरवर्षी विविध वाहिन्यांवरील ’रिऍलिटी शोज’साठी हजारो नवोदित कलाकार ’ऑडिशन’ देत असतात. त्यातील १०-२० कलाकारांची निवड करून पुढे ’रिऍलिटी शो’ चालू ठेवला जातो. या स्पर्धक कलाकारांना देशातील नामवंत कलाकारांचे मार्गदर्शन मिळत असते. शोच्या पूर्ण प्रवासात ही नवोदित कलाकार मंडळी प्रचंड मेहनत घेऊन स्वतःला सिद्ध करत असतात. असे शोज दरवर्षी होतात मग या स्पर्धेत निवडलेले, तयार झालेले स्पर्धक पुढे जातात तरी कुठे? यांची मेहनत सार्थकी लागते का ? यापैकी किती जणांचे त्यांच्या क्षेत्रात करिअर घडते ? किती जणांना पुढे हिंदी सिनेसृष्टीकडून संधी दिली जाते? भारतभूमी ही कलाकारांची भूमी आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून कलाकार घडत असतात. मग हिंदी चित्रपट सृष्टीतील निर्माता, संगीतकार मंडळींना भारतीय कलाकारांमध्ये अशी कोणती उणीव जाणवते ज्यासाठी त्यांना पाकिस्तानातून कलाकार आयात करावे लागतात? बॉलिवूडमध्ये पडलेली ही प्रथाच मुळात चुकीची असल्याने पाकिस्तानी कलाकार आयात करणाऱ्या या निर्मात्यांना भारतीय जनतेनेच खडसावले पाहिजे.

**- जगन घाणेकर, मुंबई.**

जन्म हा अखेरचा

# सेव्यप्रसादिस्थल



कुबेराला रघुराजाचा पराक्रम ज्ञात होता. तो स्वारी करायला येणार आहे हे कळताच कुबेर गर्भगळित झाला. राजाच्या स्वारीचे कारण जेव्हा त्याला समजले तेव्हा युद्ध टाळण्यासाठी राजाचा खजिना संपत्तीने भरुन टाकला. राजसेवकाने ही वार्ता राजाला सांगताच स्वारीचा बेत रद्द करुन राजा सैन्यासह माघारी आला.

राजाने कौत्स्याला हवे तेवढे धन घेण्यास सांगितले. परंतु कौत्साने आवश्यक तेवढेच धन घेतले. राजा हा दातृत्वाचा आदर्श होता तर कौत्स हा भिक्षुकाचा आदर्श होता. त्याने चौदा कोटी सुवर्णमुद्रा घेऊन गुरुला अर्पण केल्या. गुरुला धन अर्पण केल्याची ही कथा कालिदासाने ‘रघुवंशा’त सांगितली आहे.

धन देणे हा विद्याप्राप्तीचा एक मार्ग असला तरी गुरुची सेवा केल्यानेच विद्याप्राप्ती होते. गुरुसेवेचे आप्तसेवा, स्थानसेवा, अंगसेवा आणि सद्भावसेवा असे चार प्रकार आहेत. आपले घर जसे आपण स्वच्छ राखतो, त्याप्रमाणे गुरुगृहाची स्वच्छता करणे याला ‘स्थानसेवा’ म्हणतात. जेव्हा आपण एखादा आप्त आपल्या घरी येतो तेव्हा मोठ्या प्रेमाने आपण त्याचा आदरसत्कार करतो, त्याला प्रेमाने खाऊ-पिऊ घालतो. त्याप्रमाणे गुरु आपल्या घरी आल्यावर त्यांची आप्तासारखी सेवा करणे ही ‘आप्तसेवा’ होय. आपले आपल्या शरीरावर आणि अवयवांवर अत्यंत प्रेम असते. आपले हातपाय कोणी दाबले तर आपल्या शरीराला सुख मिळते, त्याप्रमाणे स्वत:च्या हातांनी गुरुचे चरणसंवाहन करणे याला ‘अंगसेवा’ म्हणतात. ‘सद्भावसेवा’ ही या तिन्हीपेक्षा श्रेष्ठ सेवा आहे. स्थानसेवा, आप्तसेवा आणि अंगसेवा करताना जर मनात सद्भाव नसेल तर त्या सेवांना काही अर्थ राहत नाही. गुरुची सेवा किती काळ करावी? सहा महिने, वर्षभर आणि जर एवढ्या काळात गुरुकृपा लाभली नाही तर गुरुकृपा लाभेपर्यंत करावी. त्याला कसलीही कालमर्यादा नाही.

**(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

# सकारात्मक जीवनाचा मंत्र !

‘परीक्षा पे चर्चा’ कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेले अभिभाषण आणि गुरुमंत्र हे विद्यार्थ्यांसाठी असा प्रकाशस्तंभ आहे की, भविष्यातील अज्ञात वाटेवर पाऊल ठेवताना आणि परीक्षेच्या गुंतागुंतीच्या क्षणांमध्ये त्यांनी तो सोबत ठेवला, तर त्यांच्या मार्गात कुठेही अडथळे येणार नाहीत, तणाव आणि संकट येणार नाही.




कारण मोदींचे हे गुरुमंत्र त्यांच्या कर्तृत्वातून, साधनेतून, अनुभवातून आणि आध्यात्मिक अभ्यासातून जन्माला आले आहेत, जे विद्यार्थी तसेच शिक्षक आणि पालकांसाठी रामबाण उपाय आहेत. पंतप्रधान मोदी मुलांमधील ही भीती आणि तणाव दूर करण्यासाठी दरवर्षी ‘परीक्षा पे चर्चा’ कार्यक्रम आयोजित करतात. विद्यार्थी आणि परीक्षांसाठी स्वतंत्र कार्यक्रम हा निश्चितच दूरगामी विचारांचा परिणाम आहे. शिक्षणात नवीन मूल्ये रुजवणे आणि त्याला सुंदर आकार देणे ही मोठी जबाबदारी मानून मोदी अशा कार्यक्रमांना महत्त्व देत आहेत. परीक्षा मनोरंजक आणि तणावमुक्त करण्यासाठी नवीन मार्ग सादर करून, ते विद्यार्थ्यांच्या निराशेला संधींच्या चौकटीत बनवतात आणि त्यांना ताज्या हवेचा श्वास घेतल्यासारखे वाटू देतात.

**- प्रा. विजय कोष्टी, जि. सांगली.**

# साहित्यिकांची जबाबदारी मोठी

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९७ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अमळनेर येथील पूज्य साने गुरुजी साहित्य नगरी, प्रताप महाविद्यालयात पार पडले. एकीकडे साहित्य संमेलनाचा माहोल सुरू असताना त्याचवेळी राज्यात मराठा आणि इतर मागासवर्गातील समाजाच्या आरक्षावरून संघर्ष उभा राहिला आहे. तसेच समाजात जात, पंथ आणि धर्मवेड अधिक उंचावते आहे. माणसांपेक्षा या संस्था अधिक वरचढ ठरत आहेत. माणूस स्वस्त झाला आणि बकरा महाग झाला, असे आपले वर्तमान सांगत आहे. समाजात विविध कारणांवरून संघर्ष उभे राहत आहेत. माणसं मारली जात आहेत. संवेदना हरवल्याचे चित्र वारंवार भोवतालामध्ये दिसत आहे. अशा वेळी साहित्यिक आणि साहित्याची समाजमन जागवण्याची जबाबदारी अधिक वाढत आहे.

आपण जे बोलत आहोत त्यामुळे समाजात भेदाच्या भिंती निर्माण होत आहेत, हे ज्ञात असूनही स्वत:च्या स्वार्थाकरिता त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. आपणच आपला आत्मघात करतो आहोत तरी पण त्याचे दु:खही वाटेनासे होत आहे. समाजाच्या भल्यापेक्षा माझ्या जातीचा, माझ्या धर्माचा माणूस महत्वाचा वाटू लागतो आणि त्यात माणूसपण संपुष्टात येते आहे.

खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे हा भाव समाजमनातून हरवत चालला की साहित्याची अधिक गरज अधोरेखित होते. अशावेळी साहित्याने समाजात पेरणी करण्याची वाट चालण्याची गरज अधिक उंचावत जाते. समाजात साहित्याने जी पेरणी करायची असते ती वर्तमानात झालेली दिसत नाही. अशावेळी साहित्य संमेलनाच्या माध्यमातून समाज मनावर विचारांचे अधिराज्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे. अन्यथा साहित्य संमेलने म्हणजे केवळ मोठ्या खर्चाचे जंगी उत्सव ठरून राहतील.

समाज आणि साहित्य यांच्यात एक नाते असते. साहित्यातून माणसांची मस्तके घडवली जात असतात. जेव्हा पुस्तके मस्तके घडवतात, तेव्हा त्या समाजात लाचार माणसं घडत नाहीत. आज समाज आणि साहित्य यांचे नाते सैल होत चालले आहे का, असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आहे. त्यामुळे साहित्य संमेलनाच्या वाढत्या उत्सवी स्वरूपाला आवर घालून संमेलने ही अधिकाधिक विचारमंथन करणारी ठरायला हवीत. नाही तर त्यांचा समाजहितैशी हेतू बाजूला राहील. जगाच्या पाठीवर निर्माण होणारे साहित्य हे कोणत्याही समाजासाठी जीवनसत्व पुरवत असते.

त्या जीवनसत्वामुळे समाजाचा विकास होत असतो. त्या साहित्यातून समाजाचे भरण आणि पोषण होत असते. त्यावरच समाजाची वैचारिक वृद्धी आणि समृद्धी होत असते. साहित्य कोणत्या प्रकारची पेरणी करते त्यावरच समाजाची वाटचाल अवलंबून असते. आज समाजातील वाढता संघर्ष आणि अभिव्यक्तीच्या नावाखाली खालावत चाललेला संवाद, चर्चा, प्रतिक्रिया, मते व्यक्त करण्याचा दर्जा पाहिला की साहित्यिक आणि त्यांच्याकडून निर्मिल्या जाणाऱ्या साहित्याची जबाबदारी अधिक अधोरेखित होत जाते. त्यामुळे समाज उन्नत आणि अधिक संवेदनशीलतेच्या वाटेने घेऊन




जायचा असेल, तर वर्तमानातील संमेलनांनी त्याला अनुसरून समाजमन जागवण्याची गरज आहे. यावेळी साहित्यिकांनी जागल्याची भूमिका अधिक प्रकर्षाने पार पाडण्याची गरज आहे. कारण समाजात सध्या ज्या संघर्षाच्या लाटा उसळत आहेत, त्याचे वादळात रूपांतर होऊन मोठे सामाजिक नुकसान होणार नाही, याची वेळीच काळजी घेण्याची गरज आहे. केवळ सरकार आणि न्यायव्यवस्था यांच्यावर सगळी सामाजिक जबाबदारी सोपवून चालणार नाही, तर अधिक परिपक्व आणि विचारशील समाजमन तयार करण्यासाठी कसोशीने प्रयत्न होण्याची गरज आहे. साहित्याच्या माध्यमातून समाज जिवंत ठेवण्याचे काम घडत असते. समाजात चैतन्य भरण्याबरोबर समाजाला सुयोग्य संस्काराच्या दिशेने घेऊन जाण्याचे काम साहित्य करत असते. साहित्य समाजाला अधिक संवेदनशील बनवत असते. साहित्यामुळे आत्मपरीक्षणाच्या दिशेचा प्रवास घडण्यास मदत होत असते. साहित्याशी नाळ जुळलेला समाज हा नेहमी आत्मपरीक्षणाच्या वाटेने जात असतो. त्यामुळे आपण जे काही करत आहोत त्याचा समाज, राष्ट्र, व्यक्तींच्या जीवनावर काही परिणाम होतो का? याचे सतत भान ठेवले जाते. त्यामुळे समाजात असे भान असल्यामुळे समाज अधिक गतीशील होण्याची शक्यता निर्माण होते. अन्यथा स्वत:च्या पलीकडचा विचार निर्माण होत नाही. स्वार्थ हाच केंद्रस्थानाचा विचार असेल, तर तो समाजही प्रगती करू शकत नाही. समाजात स्वार्थाचा विचार जेव्हा बळावतो, तेव्हा साहित्यिकांनी अधिक जबाबदारीने समाजमन घडविण्यासाठी पुढे येण्याची गरज असते.

**- संदिप वाक्चौरे.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

## संक्षिप्त वृत्त

### माळकवठा येथे महिलेचे घर फोडले; ७३ हजारांचे दागिने गायब

**सोलापूर** : बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने एका महिलेच्या घरातून रोख रकमेसह ७३ हजार रुपयाचे दागिने पळविले. ही चोरी माळकवठा (ता.दक्षिण सोलापूर) येथे घडल्याचे उघडकीस आले. या संदर्भात जगदेवी अर्जुन कट्टीमनी (रा. माळकवठा) यांनी मंद्रुप पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या गेल्या सोमवारी सकाळी घराला कुलूप लावून परगावी गेल्या होत्या. रविवारी परतल्यानंतर त्यांना घराचे मोडल्याचे दिसून आले. चोरट्याने दरवाजाचे कुलूप तोडून पेटीतील १९ ग्रॅम सोन्याचे दागिने, १० हजार रुपये रोख आणि चांदीचे वस्तू चोरून नेले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार गुंडाळे पुढील तपास करीत आहेत.

---

### ऐतिहासिक भूमिकेत अभिनेते रवी काळे

**सोलापूर** : कोणत्याही भूमिकेला योग्य न्याय देण्याचे कसब अंगी असलेले अभिनेते रवी काळे यांनी मराठी,हिंदीसह, तामिळ, तेलगू चित्रपटसृष्टीतही आपल्या अभिनयाचा ठसा उमटवत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. रवी काळे यांनी आजवरच्या आपल्या वेगवेगळ्या भूमिकांमधून ते सिद्ध केलंय. दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित 'शिवरायांचा छावा' या चित्रपटातही ते आता स्वराज्याच्या गुप्तचर यंत्रणेचे प्रमुख बहिर्जी नाईक यांची दमदार भूमिका साकारणार आहेत.या चित्रपटाच्या निमित्ताने रवी काळे प्रथमच ऐतिहासिक व्यक्तिरेखा साकारताना दिसणार आहेत.ए.ए.फिल्म्स आणि एव्हरेस्ट एंटरटेंमेंट प्रस्तुत 'शिवरायांचा छावा' १६ फेब्रुवारीला चित्रपटगृहात दाखल होणार आहे.

---

### 'छत्रपती संभाजी' चित्रपट सर्वत्र प्रदर्शित

**सोलापूर** : छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाला आणि बलिदानाला जगाच्या इतिहासात तोड नाही संकटाला निर्भीडपणे सामोरे जात पराक्रमाच्या जोरावर अल्प काळात मराठा साम्राज्याच्याविस्तार आणि संरक्षण करणाऱ्या पराक्रमी राजाचा जीवनपट उलगडणारा राकेश सुबेसिंह दुलगज निर्मित आणि दिग्दर्शित 'छत्रपती संभाजी' हा चित्रपट २ फेब्रुवारीला चित्रपटगृहात प्रदर्शित झाला आहे.'परफेक्ट प्लस एंटरटेनमेंट' आणि 'एजे मीडिया कॉर्प' प्रस्तुत 'छत्रपती संभाजी' हा चित्रपट मराठी,हिंदी,तमिळ,तेलगू आणि इंग्रजी मध्ये एकाच वेळी प्रदर्शित होत आहे.

---

### गड्डा जत्रेत चाकूने मारहाण सख्खे भाऊ जखमी

**सोलापूर** : तिकीट काढण्याच्या कारणावरून लोखंडी रॉड आणि काठीने केलेल्या मारहाणीत दोघे भाऊ जखमी झाले . ही घटना गड्डा मैदान येथील फिश टँकजवळ रविवारी रात्रीच्या सुमारास घडली. अरबाज फैज मुल्ला (वय २२) आणि त्याचा भाऊ शाहनवाज (वय २३ दोघे रा. गांधीनगर,अक्कलकोट रोड) अशी जखमी झालेल्या भावंडाची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काल रात्री नऊ वाजेच्या सुमारास गड्डा मैदान येथील फिशटँक जवळ त्यांना सैपन मौला बंदगी आणि इतर पाच जणांनी मिळून मारहाण केली. अशी नोंद सदर बझार पोलिसात झाली आहे.

---

### साईबाबा चौकाजवळ चाकुने मारहाण; तरुण जखमी

**सोलापूर** : जेलरोड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील साईबाबा चौकाजवळ येथे चाकू आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत तोफीक शकील अहमद (वय १८) हा तरुण जखमी झाला. ही घटना आज रविवारी सकाळी दहा वाजेच्या सुमारास घडली. त्याला उमेश कोडम (मित्र) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्याला रोहित श्रीपती खंडागळे याने जखमीच्या घराजवळ येऊन मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली आहे.

---

### तांदुळवाडी येथे दुचाकीच्या धडकेने पादचारी तरुण ठार

**सोलापूर** : हैदराबाद मार्गावरील तांदूळवाडी (ता.दक्षिण सोलापूर) येथील ब्रीज जवळ पाठीमागून दुचाकी धडकल्याने प्रशांत अरुण देवरे (वय २१, रा.निंबाळा, जि. धाराशिव) हा पादचारी तरुण जखमी होऊन उपचारापूर्वी मयत झाला. हा अपघात सोमवारी दुपारच्या सुमारास घडला. प्रशांत देवरे हा दुपारी ४ वाजेच्या सुमारास तांदुळवाडी येथील ब्रिज वरून पायी निघाला होता. त्यावेळी पाठीमागून अनोळखी दुचाकी धडकल्याने तो जखमी झाला होता. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

---

### शेटेवस्ती येथे गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : मरीआई चौक परिसरातील शेटे वस्तीत राहणाऱ्या एका ५० वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. ज्योतीराम किसनराव साळुंखे (वय ५० रा. शेटेवस्ती असे मयताचे नाव आहे. आज सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास त्याच्या मृतदेह घरातील छताच्या पंख्याला नायलॉन दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला . या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार रुपनुर पुढील तपास करीत आहेत.

# पोलीस अन् सामान्य माणूस यांच्यातील अंतर कमी करण्यावर राहील भर : एम.राजकुमार

## नूतन पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांनी स्वीकारला पदभार



**सुराज्य/सोलापूर**

पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्याबरोबरच पोलीस आणि सामान्य माणूस यांच्यातील अंतर कमी करण्यावर आपला भर राहील,असंही नूतन पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांनी सांगितले.

मावळते पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्याकडून त्यांनी सोमवारी सायंकाळी ०४ वाजता पदभार स्वीकारला. पोलीस आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी औपचारिक गप्पा मारल्या.यावेळी आयुक्तालयातील सर्व अधिकारी उपस्थित होते.

सर्वसामान्य जनतेच्या मनात पोलिसाबद्दल आकस वा द्वेष निर्माण न होता विश्वासाचा भाव निर्माण व्हावा,माझं शहर सुरक्षित आहे,या शहरात मी सुरक्षित आहे,असा आत्मविश्वास सामान्य नागरिकांच्या मनात निर्माण होईल, या दृष्टिकोनातून सर्वसामान्य माणूस केंद्रित ठेवून काम करण्याचा निर्धार सोलापूरचे नूतन पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी व्यक्त केला.

पोलीस प्रशासन हे जनतेच्या सेवेसाठी आहे,असा विश्वास निर्माण होण्याच्या दृष्टीने मी व माझी संपूर्ण टीम कार्यरत राहील.क्राईम रेट कमी करण्यावर आपला भर असणार आहे.पोलीस आणि जनता यांच्या संवादाचा सूर मिळावा या दृष्टीने सुद्धा अधून-मधून आपण अशा कार्यक्रमाचं आयोजन करू,असे त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

मावळते आयुक्त डॉ.राजेंद्र माने यांनी अतिशय चांगले काम केले आहे,असे सांगून येत्या काळात आपण गत १० वर्षाच्या क्राईम रेट संदर्भात माहिती मागवून आणखी त्यात काय सुधारणा करता येईल,यावर आपला भर असणार आहे.कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखत वाढते डिजिटल,फ्लेक्स बोर्ड तसेच मिरवणुकीतील डीजे चे प्रदूषण कमी करण्यासंदर्भात योग्य त्या सूचना आपण पोलीस प्रशासनाला देणार आहोत,असंही नूतन पोलीस एम.राजकुमार यांनी यावेळी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना म्हटले.

यावेळी पोलीस उपायुक्त विजय कबाडे, पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, पोलीस उपायुक्त दिपाली काळे यांच्यासह सहायक. पोलीस आयुक्त राजन माने, प्रांजली सोनवणे, उदयसिंह पाटील, वाहतूक शाखेचे धनराज शिंगाडे, यांच्यासह शहरातील सर्व पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक, कर्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कडक शिस्तीचे अधिकारी असा बोलबाला

सोलापूरला नूतन पोलीस आयुक्त एम.राजकुमार हे २०१० च्या बॅचचे विद्यार्थी आहेत.मूळचे चेन्नई येथील एम. राजकुमार यांची प्रथम नियुक्ती महाराष्ट्रातच झाली.मुंबई, नागपूर,यवतमाळ नंतर जळगाव येथे त्यांनी विविध पदावर काम केले.ते पदोन्नतीने पोलीस आयुक्त म्हणून सोलापुरात आलेत.ते,जळगाव येथे पोलीस अधिक्षकपदी कर्तव्य बजावत असताना अतिशय कडक शिस्तीचे अधिकारी असा त्यांचा बोलबाला होता.त्यांनी केवळ १५ महिन्याच्या कालावधीत शहरातील ५६ नामचीन गुंडांवर मोक्कातंर्गत कारवाई केली,हेही त्यांच्या कार्यकालाचं वैशिष्ट्य राहिले.

### निरोप अन् पदभार एकाच दिवशी

सोमवारी सायंकाळी नूतन आयुक्त एम.राजकुमार यांचे पोलीस आयुक्तालयात आगमन झाले.त्यांनी यापूर्वीचे आयुक्त डॉ.राजेंद्र माने यांच्याकडून पदभार स्विकारला. त्यानंतर पार पडलेल्या निरोप समारंभात,अनेक पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांनी डॉ.माने यांच्या कार्याचं कौतुक केले.तसंच उत्कृष्ट सेवा करण्याची ही नूतन आयुक्तांना ग्वाही दिली.

---

# सुरेश पाटलांच्या जनसंवाद मेळाव्यास मोठा प्रतिसाद

## नागरिकांनी वाचला समस्यांचा पाढा

**सुराज्य/सोलापूर**




कधी कमी दाबाने तर कधी गढूळ, तेही रात्री-अपरात्री, अनियमित पाणीपुरवठा, घंटागाडी येत नाही, वाढलेली झाडे, अस्वच्छता, दिवाबत्ती गुल, तुंबलेल्या ड्रेनेज लाईन, घाण, दुर्गंधीचे साम्राज्य, आरोग्याचा प्रश्न अशा एक नव्हे अनेक समस्यांचा पाढा नागरिकांनी भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष जनसेवक सुरेश पाटील यांच्या जनसंवाद मेळाव्यात वाचला. यातील काही समस्या जागेवर सोडवण्यात आल्या.

प्रभाग तीनमधील दाळगे प्लॉट, हनुमान मंदिरात जनतेच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी जनसंवाद मेळावा झाला. यावेळी नागरिकांसह महिलांनी समस्यांचा पाढा वाचला. बिपीन पाटील, अर्चना कोकाटे, उर्मिला नागमोती, नागरबाई भोसले, ऐश्वर्या तुरेराव, कविता सौंडे, मंदाकिनी पवाडे, प्रभावती अंटद, सुजाता होटगी, राजश्री सिंदगी, संध्या काळे, नागव्वा टोपे, महादेवी पिरजाबा, रेश्मा गवते, श्रीदेवी मुन्नूरेड्डी, दीपाली चव्हाण, सुरेखा जगले, कविता रुईकर, सुनिता मैंदर्गी, रूपाली कुंभार, अनिता स्वामी, ज्ञानेश्वर बच्चल, शशिकांत मुन्नूरेड्डी, आप्पू आग्रे, राजू पोद्दार, प्रताप काळे, श्रीशैल कुंभार, रतन काळे, नागेश खैरमोडे, उमाकांत बच्चल, रुपेश दुधनी, गणेश कुंभार, विराज हिरेमठ, आदित्य स्वामी, गीता जकापुरे, संदिप महाले, यल्लप्पा करली, रोहन नागमोती, प्रशांत कलशेट्टी, किरण मेटी, भीमा पुजारी, विजय कोळी आदी उपस्थित होते.

दाळगे प्लॉट, मनपा शाळा क्र. २ येथे वॉल कंपाउंडलगत आतील बाजूला घाण, कचरा, आजोरा माती टाकली आहे. यामुळे घाणीचे साम्राज्य पसरले आहे. जेसीबीने घाण, झाडेझुडपे काढावी, साफसफाई करावी, सार्वजनिक शौचालय परिसरात घाणच घाण आहे. याच ठिकाणी मंदिरे आणि घरेही आहेत, याचा नागरिकांना त्रास होत आहे. आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यावर प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी आरोग्य शिबीर घ्यावे, फवारणी, धुराळणी करावी, सॅनिटरी इन्स्पेक्टर, मुख्य आरोग्य निरीक्षकांनी पाहणी करुन अस्वच्छतेची दखल घ्यावी आदी मुद्दे नागरिकांनी मांडले. सिद्धव्वा कुंभार यांनी पाण्याचा मुद्दा मांडला, पल्लवी हिरेमठ यांनी महिलांसाठी योजना राबवावी, परिसरात फवारणी, धुराळणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. कविता रुईकर यांनी घंटागाडी येत नसल्याची तक्रार करत या परिसरात ओपन जीमची मागणी केली.

# शिवजन्मोत्सव महामंडळाच्या उत्सव अध्यक्षपदी सुभाष पवार, कार्याध्यक्षपदी रवी मोहिते

**सुराज्य/सोलापूर**

१९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती जल्लोषात साजरी केली जाणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर सोलापूरात शिवस्मारक सभागृहात श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाची पूर्व नियोजित बैठक पार पडली. या बैठकीत उत्सव अध्यक्षपदी सुभाष पवार व कार्याध्यक्ष पदी रवी मोहीते तर खजिनदार सुशिल बंदपटे यांची नियुक्ती करण्यात आली

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ मुर्तीस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर माजी नगरसेवक स्व. किरण पवार व सुनील कामाठी यांना आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी व्यासपीठावर श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पदमाकर काळे, कार्याध्यक्ष श्रीकांत डांगे, शिवचरित्रकार डॉ.शिवरत्न शेटे,जयकुमार माने, मनीष देशमुख, दिलीप कोल्हे, राजन जाधव, अमोल शिंदे माऊली पवार, विनोद भोसले, सुनील रसाळे, शिवाजीराव घाडगे गुरुजी, राजाभाऊ सुपाते, विनोद भोसले, विजय भोईटे, विजय पुकाळे, बाळासाहेब पुणेकर, बजरंग जाधव, नागेश ताकमोगे, श्रीकांत घाडगे, अंबादास शेळके, शिवकुमार कामाठी, प्रीतम परदेशी, प्रकाश ननवरे, राजू राजाभाऊ काकडे ,विक्रांत मुन्ना वानकर, लहू गायकवाड, माऊली पवार, जयवंत सलगर, सूर्यकांत पाटील, जी.के.देशमुख, भाऊसाहेब रोडगे, प्रताप सिंह चव्हाण, जयवंत सलगर, निर्मला शेळवणे, स्वाती पवार, मुळे मॅडम, राजू आलुरे, आबा सावंत, माजी अध्यक्ष मतीन भाई बागवान, लता फुटाणे, विवेक फुटाणे, सचिन स्वामी, देविदास घुले यांची उपस्थिती होती.

### नूतन कार्यकारणी अशी

अध्यक्ष (सुभाष पवार) कार्याध्यश (रविमोहिते) उपाध्यक्ष (अर्जुन शिवशिंगवाले, अंबादास सपकाळे, दिलीप बंदपटे, नागेश यलमेळी मनिषाताई नलावडे), महिला सेक्रेटरी (लताताई ढेरे) सह सेक्रेटरी (सचिन तिकटे) खजिनदार (सुशिल बंदपटे) सह खजिनदार-(गणेश माळी) मिरवणूक प्रमूख (महेश धाराशिवकर), (उपमिरवणूक प्रमूख (नामदेव पवार) कुस्ती प्रमूख (बापू जाधव, अमर दुधाळ) प्रसिध्दी प्रमूख (वैभव गंगणे बसू कोळी)

---

### थोरला मंगळवेढा तालिमच्यावतीने स्नेहभोजन

डॉल्बिचा कर्कश आवाज वाजवून चढा-ओढ करण्यापेक्षा लेझिमचे उत्कृष्ट डाव, मर्दानी खेळ सादर करावेत. सामाजिक उपक्रमांवर प्राधान्याने भर देण्याचा निर्णय बैठकीत झाला. यंदाही मिरवणूकीत २१ हजार शिवभक्तांना स्नेहभोजनाचे आयोजन थोरला मंगळवेढा तालिमने केले आहे. स्नेहभोजनाचा हजारो शिवभक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन अमोल शिंदे यांनी यावेळी केले.

# भाजपचे शहर जिल्ह्यात ४ ते ११ फेब्रुवारीपर्यंत गाव चलो अभियान

**सुराज्य/सोलापूर**



सोलापूर शहर व जिल्ह्यात भाजपच्या वतीने ४ ते ११ फेब्रुवारी पर्यंत गाव चलो अभियान राबविण्यात येत आहे. या माध्यमातून केंद्रशासानाच्या योजना जनते पर्यंत पोहोचवणार असल्याची असल्याची माहिती आ. सुभाष देशमुख व आ. विजयकमार देशमुख यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत दिली.

दहा वर्षाच्या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरीब, कल्याण, महिला सशक्तीकरण, देशाची अंतर्गत आणि बाहय सुरक्षा अशा अनेक क्षेत्रात मोदी सरकारने मोठी कामगिरी करत आंतरराष्ट्रीय पातळीवरही देशाचे नाव उंचावले आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने केंद्र आणि राज्य सरकारांची यशोगाथा तळागळापर्यंत पोहचवण्यासाठी गाव चलो अभियानाचे आयोजन करण्यात आले असल्याचे देशमुख यांनी सांगितले.

अभियानात भाग घेणाऱ्या कार्यकर्त्यांना प्रवासी कार्यकर्ता म्हणून संबोधण्यात येत आहे. अनेक ठिकाणी मोठया लोकसंख्येची खेडगाव आहेत, तर छोटया छोटया वस्त्या, वाड्यांच्या मिळून बनलेल्या ग्रामपंचायतीही आहेत. एक हजार लोकसंख्या असलेल्या खेडेगावात एक कार्यकर्ता पाठविला जाईल. प्रत्येक बुथला एक कार्यकर्ता याप्रमाणे नियोजन केले आहे.

या पत्रकार परिषदेत भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, अभियानचे शहर संयोजक सुधाकर नराल, राजकुमार पाटील आदी उपस्थित होते.

गाव चलो अभियान दरम्यान ८ फेब्रुवारी रोजी आ. सुभाष देशमुख हे मंद्रूप गावाला भेट देणार आहेत. बूथ कार्यकर्त्यांसाठी अभ्यास वर्ग होणार आहे.

आमदार, खासदारांनी केलेली कामे व योजना यांचा लाभ लोकांपर्यंत मिळाला का ? याचीही माहिती घेतली जाणार असल्याचे आ. विजयकुमार देशमुख यांनी सांगितले.

# शरद पवारांचा पक्षासाठी नाहीतर स्वत:च्या प्रचारासाठी वापर

## उमेश पाटील यांची जितेंद्र आव्हाडांवर टीका

**सुराज्य/सोलापूर**

अजित पवारांच्या प्रत्येक स्टेटमेंटचे राजकारण करत शरद पवार यांच्या पासून अजित पवार यांना दूर ठेवण्याचा उद्योग जितेंद्र आव्हाड करत आहेत. पवारांच्या तब्येतीची काळजी त्यांना नाही, पवारांचा वापर पक्षासाठी नाहीतर स्वत:च्या प्रचारासाठी करणाऱ्यांनी दारूच्या नशेत वाचाळ बडबड करू नये, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशप्रवक्ते उमेश पाटील यांनी आव्हाड यांना लगावला आहे

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भाषणातील काही शब्दाचा विपर्यास करायचा आणि आपल्याला सहानुभूती मिळवण्यासाठी त्याचा वापर करायचा, ही जितेंद्र आव्हाडांची जुनी चाल आहे. त्यांना शरद पवार हे पक्षासाठी नव्हे तर स्वत:च्या प्रचारासाठी हवे आहेत अशी टीकाही त्यांनी सोलापुरातील पत्रकार परिषदे केली. शनिवारी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यांनी शहर आणि ग्रामीण अशा दोन्ही कार्यकर्त्यांची मेळावे घेतले. दोन्ही कार्यालयाची उद्घाटने केली . पवार यांच्या उपस्थितीत भरगच्च कार्यक्रमाने शनिवारचा दिवस संपला. सोलापूर शहराला आणि जिल्ह्याला कोट्यवधी रुपयाचा निधी मिळाला आणि



कार्यकर्त्यांना आपले मत मांडता आले. कोणी मत तर कोणी गाऱ्हाणे मांडले. सर्वांच्या प्रश्नाला न्याय मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना नव्याने उभारी मिळाल्याच पाटील म्हणाले.

पत्रकार परिषदेस शहर जिल्हा अध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष वसीम बुऱ्हाण, अल्पसंख्यांक राष्ट्रीय सदस्य फारुख मटके, सायरा शेख, सुहास कदम, श्रीकांत शिंदे व जिल्हा कार्याध्यक्ष रामेश्वर मासाळ आदी उपस्थित होते.

### महेश 'कोठे'ही जाणार नाहीत

महेश कोठे यांच्याबरोबर असलेले बिज्जू प्रधाने, किशोर पाटील, मंदाकिनी तोडकरी, कल्पना क्षीरसागर यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीमध्ये प्रवेश केला आहे. त्यामुळे ते 'कोठे' ही जाणार नाहीत तेही आमच्याबरोबर असल्यासारखेच आहेत.

---

### राणे यांच्या वक्तव्याशी असहमत

लोकशाहीमध्ये प्रत्येकाला मत मांडण्याचा अधिकार आहे, पण दोन धर्मामध्ये जातीय तेढ निर्माण करण्याचे वक्तव्य नितेश राणे करत असतील तर ते त्यांचं वैयक्तिक मत आहे. त्याच्याशी आम्ही सहमत नाही. राणे यांनी दोन जातीमध्ये वितूष्ट निर्माण होईल असे वक्तव्य करू नये.


# आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा

**सोलापूर** : आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सात जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

निलोफर असलम नाईकवाडी, जाकिर शेख, मजाहिद शेख, शहानवाज, नरोद्दीन मुल्ला,निलोफरचे आजोबा शफी व निलोफरची आई (सर्व.रा.सिद्धेश्वर नगर) असे गुन्हा दाखल केलेल्यांची नावे आहेत. ही घटना ४ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेतीन ते पावणेचार वाजण्याच्या सुमारास ब्रह्मदेवनगर येथे घडली. मिनाज नाईकवाडी (वय-३२,रा.ब्रह्मदेव नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद केली आहे.

फिर्यादी यांची जाऊ निलोफर हिने महिला तक्रार निवारण केंद्र येथे फिर्यादीविरुद्ध तसेच फिर्यादीचे पती, नणंद, नणंदचे पती, लहान नणंद समरीन जमादार व तिचे पती महबूब यांच्याविरुद्ध खोटी तक्रार दिली होती. वरील आरोपींनी संगनमत करून फिर्यादीच्या पतीकडून दहा लाख रुपये दे अर्ज माघारी घेतो,नाहीतर जेलमध्ये घालतो, अशी धमकी दिल्याने फिर्यादीचे पतीने त्रासाला कंटाळून आत्महत्या केली, असे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नामदे हे करीत आहेत.

## संक्षिप्त वृत्त



माळशिरस तालुका भाजपाध्यक्ष मामासाहेब पांढरे यांचा सन्मान करताना आ. राम सातपुते व इतर मान्यवर.

### तालुकाध्यक्षपदी निवडीबद्दल पांढरे यांचा आ. राम सातपुते यांच्याकडून सत्कार

**नातेपुते** : नातेपुते येथील मामासाहेब पांढरे यांची भाजपाच्या माळशिरस तालुकाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल आ.राम सातपुते यांच्याकडून शाल फेटा हार श्रीफळ देऊन सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या. भाजप पक्ष वाढवण्यासाठी तसेच तरुणांची जनतेची कामे जिद्दीने करण्यासाठी तुम्हा सर्वांच्या शुभेच्छा मला ऊर्जा देतील अशी आशा मामासाहेब पांढरे यांनी सत्काराप्रसंगी व्यक्त केली. आ. राम सातपुते यांनी तालुक्यात काम करत असताना येणाऱ्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न करू,असे सांगितले. यावेळी तेजस पाटील, राहूल रुपनवर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

---



### प्रणिता कांबळे आदर्श प्रशासकीय सेवा सन्मान पुरस्काराने सन्मानित

**उत्तर सोलापूर** : सोलापूर सामाजिक न्याय भवन (बार्टी)च्या प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे यांना आदर्श फाउंडेशनच्यावतीने आदर्श प्रशासकीय सेवा सन्मान, पर्सन ऑफ द इयर, पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आदर्श फाउंडेशन संस्था विविध क्षेत्रातील व्यक्तींना प्रोत्साहित करण्याचे काम करते. कोल्हापूर येथील राजर्षी शाहू स्मारक सभागृह येथे झालेल्या सम रंभात कोल्हापुरी फेटा , सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन कांबळे यांना देण्यात आले. शिवसेना (ठाकरे)सांगली जिल्हाप्रमुख योजना पाटील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी मान्यवरांच्या हस्ते यशोगाथा या विशेषांकाचे प्रकाशन झाले. कमलाबाई शिंदे, दिपाली लोहार, प्रदीप माने पाटील, रेखा पाटील, प्रताप पाटील,संजय माने, सुमन साळुंखे, डॉ दगडू माने, निवेदिता शिंदे, हर्षवर्धन शिंदे, स्नेहल शिंदे, अमरसिंह शिंदे, शिल्पा महात्मे, अश्विनी माळी, संजय भोसले, संजय काटे,आदर्श फाउंडेशनचे प्रमुख विजय लोहार,कार्यवाह वनिता लोहार उपस्थित होते .प्रा गंगाराम सातपुते यांनी स्वागत केले. श्रीनिवास कळसे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा.ज्ञानेश्वरी देशपांडे यांनी केले.

---

### कारच्या धडकेत वृद्ध गंभीर जखमी

**सोलापूर** : कमावरुन घरी पायी चालत जात असताना पाठीमागून येणाऱ्या कार क्र.एमएच.१३.बीसी.९३४५ यातील चालकाने त्याच्या ताब्यातील कार हयगयीने चालून एका वृद्धास पाठीमागून जोरात धडक देऊन गंभीर रित्या जखमी केले आहे.विजय सुंदरराव वाघमारे (वय-६५,रा. सिद्धेश्वर पेठ) असे या कारच्या धडकेत जखमी झालेल्या वृद्धाचे नाव आहे. ही घटना ३१ जानेवारी रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास यशोधरा हॉस्पिटलसमोरील चौकात घडली.याप्रकरणी विजय वाघमारे यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल जाधव करीत आहेत.

---

### शिवाजी विद्यालयाचा एलिमेंट्री परीक्षेत १०० टक्के निकाल

**लातूर** : जेएसपीएम संचलित शिवाजी विद्यालय बिटरगाव या शाळेतील विद्यार्थ्यांनी एलिमेंट्री परीक्षेमध्ये बी व सी सर्टिफिकेट मिळवले. विद्यालयाचा एकूण निकाल १०० टक्के लागला. आसमा शेख, रितीका जाधव, शिवम वाडकर, किरण गिरी, सुभ्रता जगताप, माधव पांचाळ, गुलनाज शेख, प्रगती साके या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण यांच्याहस्ते करण्यात आला. विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव पाटील कव्हेकर, सचिव प्रतिभा पाटील कव्हेकर, उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, समन्वयक निळकंठ पवार, संभाजी पाटील आदींनी कौतुक केले.

---

### भा.ज.प. माढा तालुका संयोजकपदी अक्षय स्वामी



**टेंभुर्णी** : भाजप माढा तालुका संयोजकपदी टेंभुर्णीतील अक्षय स्वामी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नुकतेच भाजप पंचायत राज व ग्रामविकास विभाग सोलापूर ग्रामीण जिल्हा संयोजक अध्यक्ष नितीन नागटिळक यांनी नियुक्तीपत्र दिले आहे. त्यांच्या निवडीबद्दल पालकमंत्री चंद्रकांत पाटील, जिल्हाध्यक्ष सचिन कल्याणशेट्टी, भाजपा माढा तालुकाध्यक्ष योगेश बोबडे, विजय कोकाटे, ॲड. संतोष कानडे यांनी अभिनंदन केले आहे.

# सोलापुरात अव्वल दर्जाचे फिटनेस, लाईफस्टाईल क्लब सुरू


## पाच एकरावर बॉक्सिंग, बॅडमिंटन, क्रिकेट, फुटबॉल, टेनिस कोर्ट

**सुराज्य/सोलापूर**

इलिझियम क्लब आणि जामश्री रिॲल्टी एकत्र येत जामश्री मिलच्या जागेत पाच एकरावर अव्वल दर्जाचा स्पोर्टिंग, फिटनेस व लाईफस्टाईल क्लब सुरू करण्यात आला आहे. या क्लबमध्ये अव्वल दर्जाचे खेळ खेळायला मिळणार आहेत, अशी माहिती जामश्री रिॲल्टीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश दमाणी व इलिझियम क्लबचे संस्थापक गुरपवित सिंग यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या क्लबमध्ये जागतिक दर्जाच्या सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या क्लबच्या सदस्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या क्लबमध्ये पूर्णपणे सुसज्ज अशी व्यायामशाळा, ग्रुप स्टुडिओ, बॉक्सिंग रिंग, बॅडमिंटन कोर्ट क्रिकेट लेन्स, फुटबॉल टर्फ, टेनिस कोर्ट, हाफ ऑलिंपिक आकाराचा तापमान नियंत्रित करण्याचा तलाव, पाच हजार चौरस फुटांचा स्पोर्ट्स बार, को-वर्किंग आधुनिक बिजनेस लाउंज आणि चाळीस हजार चौरस फुटांचे अम्फी थिएटर उपलब्ध आहे. यापूर्वी मुंबई, चेन्नई, पुणे येथील इलिझियम क्लबला भरघोस प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे आता सोलापुरातही संधी उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे दमाणी व सिंग यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस शर्लिन म्याम, पीटर बरवॉश इंटरनॅशनल टेनिसचे अध्यक्ष रेने झोंड्याग, बॅडमिंटन प्रोजचे संस्थापक विजय लॅन्सी, साउथ युनायटेड फुटबॉल क्लबचे तांत्रिक संचालक टेरेन्स फेलन, युसूफ पनवेलवाला आदी उपस्थित होते.



**जामश्री परिवाराकडून शिष्यवृत्ती**

इलिझियम क्लबमध्ये प्रवेश घेतलेल्या होतकरू व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पहिल्या ५० खेळाडू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची घोषणा जामश्री रिॲल्टीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश दमाणी यांनी यावेळी केली. यामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळून खेळाची आवड निर्माण होणार आहे.

# तक्रार मागे घेण्यासाठी धमकावणाऱ्याला अटक

**सुराज्य/सांगोला**

तालुक्यातील खवासपूर येथील भाऊ बोंडरे यास तक्रार मागे घेण्यासाठी शिवीगाळ करून धमकावणे व गावठी कट्ट्याने गोळीबार करून दहशत माजवणाऱ्या गुन्ह्यातील आरोपी पप्प सावंत यास सांगोला पोलिसांनी अखेर जेरबंद केले

एक फेब्रुवारी ते दोन फ ेब्रुवारी दरम्यान फिर्यादी भाऊ दादासो बोडरे यास तक्रार मागे घेण्यासाठी आरोपी पप्पू सावंत व नितीन सावंत यांनी फोनवरून शिवीगाळ करून धमकावले तसेच फिर्यादीच्या घराजवळ चार चाकी तुन जाऊन गावठी कट्ट्याने गोळीबार करून दहशत माजली होती या बाबत सदर गुन्ह्याचा तपास सपोनी पी एस मोरे व पथकाने आरोपींची माहिती काढून आरोपी पप्पू सावंत वय २७ राहणार खवासपूर तसेच नितीन सावंत या दोघांपैकी पप्पू सावंत यास अटक केली असून त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली कार एम एच बारा पीएम २००० व गावठी कट्टा जप्त करण्यात आले आहे सदरची कामगिरी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम सिंह गायकवाड पोलीस निरीक्षक भीमराव खंण डाळे यांचे म ार्गदर्शनाखाली सपोनी पवन मोरे पोलीस हेड कॉन्स्टेबल क्षीरसागर , झोळ, पकाले, जाधव, वाघमोडे यांनी कामगिरी बजावली

# मराठी साहित्य संमेलन सोलापूरच्या कवींनी गाजवले

**कवितांचा पाऊस; डॉ.विद्या देशपांडे, कविता मुरुमकर, मारुती कटकधोंड यांच्या सादरीकरणाला दाद**

**सुराज्य/सोलापूर**




साने गुरुजींच्या वास्तव्याने पावन झालेल्या भूमीवर कवी मनांच्या काव्य प्रतिभेला धुमारे फुटणार नाही, असे कधी होणार नाही. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन असेच रंगले ते सोलापुरच्या कवींनी सादर केलेल्या कवितांनी.

शनिवारी सायंकाळी सभामंडप दोनमध्ये कविसंमेलन पार पडले. त्यात सोलापुरच्या प्रकाश होळकर अध्यक्षस्थानी होते. संमेलनात राज्यातील सर्व भागातून कवी सहभागी झाले होते. डॉ.विद्या देशपांडे, कविता मुरुमकर, मारुती कटकधोंड यांनी सादर केलेल्या कवितांना चांगली दाद मि ळाली. टाळ्या, दाद देणारे शब्द अशांनी संमेलन सभागृह उत्साहित झाले होते.

आदल्या दिवशी शुक्रवारीही उत्तमोत्तम कवितांचे सादरीकरण झाले. इंद्रजीत भालेराव यांनी माईचा सोडून धरला पदर... अशांची कवितेत कधीच केली नाही कदर... अशा पुरुषांपासूनच कवितेला भीती होती... म्हणूनच ७०० वर्षे कविता जात्याभोवती जिती होती... या स्वरचित कवितेतून काव्यप्रतिभेचा नवा हुंकार फुंकला. यावेळी अध्यक्षस्थानी कवी देविदास फुलारी होते. कवी संजय चौधरी यांनी सूत्रसंचालन केले.

# पोलिसांबरोबर नागरिकांचीही कायदा, सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी

## माळशिरस पोलीस ठाण्याचे नूतन पोलीस निरीक्षक नारायण पवार यांचे प्रतिपादन

**सुराज्य/पिलीव**

पोलिसांबरोबर नागरिकांचीही कायदा, सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन माळशिरस पोलीस ठाण्याचे नुतन पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनीक केले.

माळशिरस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्याजागी बदली होवून आलेल नारायण पवार यांनी माळशिरस पोलीस ठाण्याचा पदभार स्विकारल्यानंतर पिलीव येथे पत्रकार व नागरकांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते.

प्रत्येक गावात तंटामुक्ती समिती असावी, ग्रामपंचायतीने सिसिटीव्ही बसवावेत, महिला सुरक्षा समीती स्थापन करावी. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या नागरिकांवर आपण कडक कारवाई करणार असल्याचे सांगीतले. यावेळी प्रास्ताविक सहायक पोलीस निरीक्षक दत्ताजी मोहीते यांनी केले. यावेळी पवार यांचा पिलीवचे सरपंच नितीन मोहीते, चांदापुरीचे सरपंच जयवंत सुळ, पठाणवस्तीचे सरपंच एजाज पठाण, पठाण वस्ती विकास सोसायटीचे चेअरमन तनवीर पठाण, सुळेवाडीचे दडस व सुळे, शिंगोर्णीचे सरपंच अक्षय धांडोरे, बचेरीचे सरपंच गोरड यांनी सत्कार केला. ज्येष्ठ पत्रकार दामोदर लोखंडे यांनीही विचार मांडले.

चांदापुरीचे ज्येष्ठ नेते केशव पाटील, विजय पाटील, नुतन उपसरपंच लोखंडे, अतुल नष्टे, संजय पाटील, प्रमोद भैस,उदय कदम ,गणेश देशमुख, सुजित सातपुते, सतीश पारसे, रशीद शेख आदी उपस्थित होते. आभार पोलीस हवालदार धनाजी झगडे यांनी मानले.



पिलीव येथे नुतन पोलीस निरीक्षक नारायण पवार यांचा पंचक्रोशीतील सरपंचांकडून करण्यात आला.


# स्वेरीतील मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागाचा ‘किर्लोस्कर फेरस लिमिटेड’शी सामंजस्य करार

**सुराज्य/पंढरपूर**

‘गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागाचा सोलापूर येथील ‘किर्लोस्कर फेरस लिमिटेड’ या कंपनीसोबत नुकताच सामंजस्य करार झाला आहे. त्याचा स्वेरीच्या विद्यार्थ्यांना करिअर घडविण्यासाठी लाभ मिळणार आहे, असे संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी सांगितले.

करारामुळे विद्यार्थ्यांना ‘इंटर्नशिप, इंडस्ट्री इंप्लांट ट्रेनिंग’च्या माध्यमातून विविध प्रकारचे फायदे होणार आहेत. प्रामुख्याने कौशल्य विकास, नवीन ट्रेंड्स बद्दल माहिती आणि देखील कौशल्य विकासासाठी तसेच नवनवीन तंत्रज्ञान अवगत करण्यासाठी या व्यासपीठाचा उपयोग होणार आहे.करारावर ‘किर्लोस्कर फेरसच्या वतीने प्लांट हेड संतोष घुमाष्टे व स्वेरीच्या वतीने ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे प्रा.अविनाश मोटे, प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. स्वेरीचे अशाच प्रकारे इतर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय औद्योगिक संस्था, संशोधन संस्था, शैक्षणिक संस्था यांच्या सोबत सामंजस्य करार केलेले आहेत. करार पूर्ण होण्यासाठी विभागप्रमुख डॉ. एस.बी.भोसले, डॉ.पी.आर.कुलकर्णी व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातील प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. यावेळी किर्लोस्करचे संतोष घुमाष्टे, ऋषिकेश कुलकर्णी यांच्यासह इतर प्राध्यापक उपस्थित होते.

कराराबद्दल संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इनचार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, आदींनी अभिनंदन केले.



स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व किर्लोस्कर फेरस लिमिटेड सामंजस्य करारप्रसंगी ऋषिकेश कुलकर्णी, प्रा.अविनाश मोटे, डॉ. एस. बी. भोसले, संतोष घुमाष्ट आदी उपस्थित होते.

# पंढरपूर -दादर रेल्वेचा साताऱ्यापर्यंत विस्तार; सांगोलकरांची गैरसोय दूर होणार

**सुराज्य/सांगोला**

पंढरपूर -दादर रेल्वेचा विस्तार मिरजपर्यंत करावा अशी प्रवासी वर्गातून मागणी होती. प्रवाशांची वाढती मागणी व गरज विचारात घेऊन रेल्वे प्रशासनाने विस्तारास मंजुरी दिली आहे.

रेल्वे क्रमांक ११०२७ व ११०२८ दादर -पंढरपूर एक्सप्रेस ही पूर्वी पंढरपूरपर्यंत आठवड्यातून तीन दिवस धावत होती. या रेल्वेचा विस्तार करावा यासाठी शहीद कामठे संघटनेने रेल्वेमंत्री, खासदार ,रेल्वेचे म हाव्यवस्थापक, विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्याकडे वारंवार निवेदने देऊन पाठपुरावा केला होता. त्याची दखल घेऊन या रेल्वेस सर्वच विभागात थांबे मि ळाल्याने प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

विस्तारित रेल्वेमुळे सांगोला परिसरातील प्रवाशांना मुंबई ,पुणे ,भिलवडी, किर्लो स्करवाडी, ताकारी, कराड, मसूर, कोरेगाव, सातारा येथे जाण्याकरता थेट सांगोल्यातून या रेल्वेने प्रवास करता येणार आहे. मुंबई व सातारा येथे नागरिकांना अल्प वेळेत, अल्प खर्चात पोहचणार आहे. त्यास रेल्वे बोर्डानेही मंजुरी दिल्याने लवकर ही सेवा सुरू होणार आहे.

# बालकाचे प्राण वाचविणाऱ्या दोघांचा ‘आपुलकी’कडून सत्कार

**सुराज्य/सांगोला**

खेळताना विहिरीत पडलेल्या अडीच वर्षीय बालकाचे प्राण वाचविणाऱ्या मयुरेश कुरुलकर व डॉ. सीमा साळुंखे यांचा आपुलकी प्रतिष्ठानकडून सत्कार करण्यात आला.

सांगोला शहरातील कुंभार गल्ली येथे वास्तव्यास असलेले नायब तहसीलदार सोमनाथ साळुंखे यांचा नातू व सागर साळुंखे यांचा अडीच वर्षाचा मुलगा धैर्य शुक्रवारी (दि.२) दुपारी खेळत खेळत घरासमोर असलेल्या विहिरीत पडला. त्याची शोधाशोध सुरु असतानाच शेजारी राहणाऱ्या मयुरेश कुरुलकर याचे लक्ष विहिरीकडे गेले. मयुरेश व मुलाची आत्या डॉ. सीमा साळुंखे यांनी पाण्यावर तरंगत असलेल्या धैर्य यांस विहिरीत उतरून बाहेर काढले. डॉ. सीमा यांनी तातडीने धैर्य याचेवर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केल्यामुळे त्याचे प्राण वाचले. याची दखल घेत आपुलकी प्रतिष्ठान व शहीद जवान बहुद्देशीय संघटना यांच्यावतीने मयुरेश कुरुलकर व डॉ. सीमा साळुंखे यांचा शाल व गुलाब रोप देऊन सत्कार केला. दोघांनी प्रसंगावधान राखून केलेल्या कार्याचे कौतुकही केले.

यावेळी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, शहीद जवान बहुद्देशीय संघटनेचे अध्यक्ष अच्युत फ ुले, विकास देशपांडे, प्रा. डॉ. राजेंद्र सूर्यवंशी, वसंत सुपेकर, प्रमोद दौंडे, अमर कुलकर्णी, प्रसन्न कदम, सोमनाथ माळी, कुरुलकर व साळुंखे कुटुंबीय उपस्थित होते.



सांगोल्यात विहीरीत पडलेल्या चिमुकल्याचे प्राण वाचविणाऱ्या मयुरेश कुरुलकर व डॉ. सीमा साळुंखे यांचा सत्कार आपुलकी प्रतिष्ठानतर्फे करण्यात आला.

**संरक्षक जाळी बसविण्याची मागणी करणार**

विहिरीला संरक्षक जाळी बसवावी. तसेच विहिरीतील गाळ काढून उन्हाळ्यातील संभाव्य पाणीटंचाई काळात कुंभार गल्लीतील नागरिकांना विहिरीचे पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी आपुलकीच्या वतीने करणार आहे.

– **राजेंद्र यादव** (अध्यक्ष, आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला)

# श्रीदत्त विद्यामंदिर, सुस्तेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम उत्साहात

**सुराज्य/पंढरपूर**

श्री दत्त विद्या मंदिर व कनिष्ठ म हाविद्यालय, सुस्ते प्रशालेचा ४४ वा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला.

उद्घाटन रामचंद्र इकारे, कार्यक्रमाचे अध्यक्ष मनोज गायकवाड, संस्थेचे अध्यक्ष डॉ.मदन क्षीरसागर, प्रा.शिवाजी वाघ, ॲड.वैभव टोमके, अजित नडगिरे, सलीम वडगावकर, दिलीप घाडगे, अनिरुद्ध सालविठ्ठल, सुनीता मोरे, प्राचार्य सुधाकर पिसे व पर्यवेक्षक रणजित शिनगारे यांच्याहस्ते झाले.

प्रमुख पाहुणे रामचंद्र इकारे व मनोज गायकवाड यांनी संबोधित केले. विविध कलांचे विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले. श्रीकांत चंदनशिवे, गणेश खिलारे, देवदत्त वाघ, श्रीराम खूपसे, जैनुद्दीन शेख, बबन कोकतरे, संदीप चौधरी, सविता इंगळे, प्रतिभा जावीर, अंजली कापसे यांनी मार्गदर्शन केले.

विविध स्पर्धांमध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. प्राचार्य सुधाकर पिसे यांचा सत्कार अतुल चव्हाण यांनी केला. विद्यार्थ्यांसाठी रुपये पंधरा हजार ठेव म्हणून मधुकर दबडे यांनी दिली. रामकृष्ण नागणे यांनी चित्रकला विषयासाठी रुपये दोन हजार देण्याचा मानस व्यक्त करुन ती रक्कम दिली. स्वागत समाधान शेजाळ, प्रास्ताविक प्रथमेश गावडे, अध्यक्षीय निवड श्रीराम खूपसे आणि अनुमोदन महेश देशमुख यांनी दिले. पाहुण्यांची ओळख राजेंद्र जाधव, जैनुद्दीन शेख यांनी करुन दिली. अहवाल वाचन प्राचार्य सुधाकर पिसे यांनी केले. पारितोषिक यादी वाचन नितीन वायदंडे, सरस्वती शिंदे, गणेश खिलारे, श्रीकांत चंदनशिवे, संदीप चौधरी, राजाराम घोडके, प्रथमेश गावडे यांनी केले. सुत्रसंचालन सविता इंगळे, प्रतिभा जावीर, सरस्वती शिंदे, अंजली कापसे यांनी केले. आभार जेष्ठ शिक्षक विलास दराडे यांनी मानले. श्रीराम खूपसे, समाधान शेजाळ,धनंजय भाजीभाकरे, महेश देशमुख, सुरेश कट्टे, नवनाथ लोणकर, गणेश पाटील, राजकुमार ढगे, किरण बोधले, संजय निंबाळकर, विष्णूपंत घोगले, धनाजी देठे, विजय पंडित, रोहित हेंबाडे, बबन पवार, बाळू बनसोडे, भीमा खंडाळे, नाना माने आदींनी परिश्रम घेतले. सांगता अंजली कापसे यांनी पसायदानाने केली.

## संक्षिप्त वृत्त

### महात्मा फुले विद्यालयाच्या विद्यार्थिनी 'अ' श्रेणीमध्ये उत्तीर्ण

**टेंभुर्णी** : सप्टेंबर २०२३ मध्ये झालेल्या शासकीय इंटरमीडिएट ग्रेड या चित्रकला परीक्षेत महात्मा फुले विद्यालय, टेंभुर्णीच्या विद्यार्थिनी संजीवनी भानवसे, कादंबरी मोगल, दीक्षा मस्के या विद्यार्थिनी 'अ' श्रेणी मिळवून उत्तीर्ण झाल्या आहेत.



विद्यालयाचे १७ विद्यार्थी 'ब' श्रेणीमध्ये आणि ३८ विद्यार्थी 'क' श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आमदार बबनराव शिंदे, जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष रणजितसिंह शिंदे, संस्थेचे अध्यक्ष नारायण भानवसे, मुख्याध्यापक विजय यादव, मुख्याध्यापक शोएब बागवान तसेच सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले. विद्यालयातील चित्रकलेचे शिक्षक संतोष माळी व रेश्मा मोरे यांनी परिश्रम घेतले.



### पिसेवाडी शाळेत शिक्षण परिषदेचे आयोजन

**वेळापूर** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिसेवाडी येथे केंद्रप्रमुख महादेवी गुंड व घोगरे सर यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रस्तरीय शिक्षण परिषद झाली. परिषदेत माझी समृद्ध शाळा, स्वच्छ शाळा सुंदर शाळा, मराठा सर्वेक्षण यामध्ये निरक्षरांची माहिती जमा करणे व प्रशासकीय बाबी आदींचे मार्गदर्शन झाले. माळशिरस तालुका प्राथमिक शिक्षक सोसायटी चेअरमनपदी निवडीबद्दल अशोक पवार, माळशिरस तालुका शिक्षक संघ कार्यकारी अध्यक्षपदी पांडुरंग वाघ, तालुका प्रसिद्धी प्रमुख बापू नाईकनवरे, पिसेवाडी शाळेचे सहशिक्षक प्रशांत पाटील यांना गुरुसेवा परिवारातर्फे सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल, बाळासाहेब काळे शिक्षक पतसंस्था पंढरपूरमार्फत दिला जाणारा जिल्हास्तर आदर्श शिक्षक पुरस्कार स्वरूप खुणे यांना प्राप्त झाल्याबद्दल वरील सर्वांचा पिसेवाडी शाळेचे मुख्याध्यापक अरुण कोडगार व केंद्रप्रमुख श्री महादेवी गुंड यांनी सन्मान केला. शिक्षक ज्ञानेश्वर साळुंखे, जालिंदर बनकर, प्रशांत पाटील, नानासाहेब घोडके, वंदना चव्हाण, अवंती सिंदफळकर यांनी नियोजन केले. सूत्रसंचालन संध्या माळी व आभार प्रदर्शन बिंटू खाडे यांनी केले. केंद्रातील सर्व शिक्षक व खाजगी शाळेतील मुख्याध्यापक उपस्थित होते.

### सो. जि. क्रीडा कार्यालयाच्या खो-खो प्रशिक्षण शिबिराचा समारोप

**सोलापूर** : सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या १४ वर्षांखालील मुलींच्या खो-खो प्रशिक्षण शिबिराचा समारोप नेहरूनगर शासकीय मैदानावर झाला. विनामूल्य प्रशिक्षण शिबिरात शहर व जिल्ह्यातील निवडक ५० खेळाडूंना प्रशिक्षण देण्यात आले. शिबिरातील सहभागी खेळाडूंना दररोज सकाळी अल्पोपहार देण्यात येत होता. शिबिरास तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, क्रीडाशिक्षक पुंडलीक कलखांबकर, गणेश कुडले, गौरीशंकर कोनापुरे, जटेप्पा नाटीकर, माजी राष्ट्रीय खो-खो खेळाडू सुनील चव्हाण, राजाराम शितोळे व सोनाली शिंदे यांनी प्रशिक्षण दिले. समारोप प्रसंगी सहभागी सर्व ५० मुलींना टी-शर्ट, गेम पॅन्ट, ट्रॅक सूट, सॉक्स व शूज जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांच्या हस्ते देण्यात आले.

### संत रोहिदास समितीच्या अध्यक्षपदी व्हनकोरे; महिला अध्यक्षपदी नरुटे

**सोलापूर** : संत रोहिदास मध्यवर्ती जयंती उत्सव समिती सोलापूर या नोंदणीकृत उत्सव समितीची बैठक दि. २६ जानेवारी रोजी झाशीची राणी पार्क कंबर तलाव येथै संत रोहिदास मध्यवर्ती उत्सव समितीचे संस्थापक विठ्ठल व्हनमारे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.



यावेळी निवृत्त शाखा अभियंता रमेश खाडे, यांच्या प्रमुख उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित २०२३ सालातील जयंती उत्सव समितीचे हिशोब सादर करण्यात आला. यावेळी संत रोहिदास मध्य. उत्सव समिती २०२४ या सालाकरीता उत्सव अध्यक्षपदी राजाभाऊ व्हनकोरे व तर महिला अध्यक्षपदी अर्चना नरुटे यांची निवड करण्यात आला. यावेळी श्रीनिवास धुळगुंडे, प्रभाकर शिंदे, सोपान थोरात, हरिभाऊ वाघमारे, संभाजी व्हनमारे, बसवराज काळे, अमर शिंदे, सुर्यकांत वाघमारे, रमेश कांबळे, जेठींगराया व्हनकोरे, खाजप्पा संनक्के, संतोष खडकेकर, श्रीकांत कांबळे, मल्लिकार्जुन दीक्षित उपस्थित होते.

# आ. आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत अवयव वाटप

## दिव्यांगांना अश्रू अनावर; ३८४ जणांना झाला लाभ

सुराज्य/पंढरपूर

**मंगळवेढा मतदार संघातील ३८४ दिव्यांगांना आमदार आवताडे यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार समाधान आवताडे वाढदिवस संयोजक समितीच्या संकल्पनेतून मोफत कृत्रिम पाय व हात वाटप करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हभप देववृत्त राणा महाराज वासकर उपस्थित होते.**

सर्वसमावेशक समाजकारण आणि सलोख्याचे राजकारण यांची विधायक कार्यपद्धती आपल्या कार्यसेवेतून पुढे नेत असताना आमदार समाधान आवताडे यांनी नेहमीच समाजातील विविध घटकांना निरनिराळ्या रूपामध्ये मदत केली, असे हभप देववृत्त राणा महाराज वासकर यांनी सांगितले. पुढील काळातही ते मतदारसंघाचे नेतृत्व करताना दिसतील. परंत मंत्रीपदही मिळेल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

जनतेच्या सेवेसाठी आजपर्यंत केलेल्या कार्यातून जेवढा आनंद प्राप्त झाला. त्यापेक्षाही मोठा आनंद आपल्याला आजच्या कार्यक्रमातून जाणवला आहे, असे आमदार आवताडे यांनी यावेळी सांगितले. कामात साधू वासवानी मिशन पुणे यांनी सहकार्य केल्याबद्दलही त्यांनी आभार व्यक्त केले.

#### दिव्यांग भगिनीला आनंदाश्रू आवरेनात

कार्यक्रमात चंद्रकला काटे या भगिनींने दिव्यांगांसाठी आ. समाधान आवताडे यांनी मोफत कृत्रिम पाय व हात दिल्याने आम्हाला त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष श्रीविठ्ठलाचेच दर्शन झाले, असे सांगत आनंदाश्रूंना वाट मोकळी करून दिली. संपूर्ण कार्यक्रमात अतिशय भावनिक वातावरण निर्माण झाले.

#### परिचारकांच्या अनुपस्थितीने उलट-सुलट चर्चा

आमदार आवताडे यांनी आयोजित केलेल्या शिबिरात माजी आ. प्रशांत परिचारक यांनी उपस्थित राहण्याचे टाळले. मतदारसंघात आवताडे व परिचारक यांच्यातील दुरावा काही केल्या कमी होताना दिसून येत नाही. दोघांमधील अंतर्गत संघर्षाची चर्चा ही कार्यक्रमाच्या ठिकाणी सुरू होती. प्रशांत परिचारक यांच्यामुळेच समाधान आवताडे हे आमदार झाले आहेत. त्यामुळे आमदार अवताडे हे परिचारक यांना घेऊनच कार्यक्रम करत असतात. मात्र, परिचारकांनी विधानसभेची निवडणूक सात-आठ महिन्यावर आली असताना आवताडेंपासून चार हात दूरी ठेवल्याने आवताडे यांचे टेन्शन हे वाढण्याची चर्चा होत आहे.

कार्यक्रमासाठी भाजप जिल्हा उपाध्यक्ष विजयसिंह देशमुख, पंढरपूर मर्चंट बँकेचे संचालक नागेश भोसले, दीपक वाडदेकर, तुकाराम कुरे, श्री. श्री. सद्गुरूचे संचालक मोहन बागल, द्रोणाचार्य हाके, विनोदराज लटके, सुनील डोंबे, संजय ननवरे, दत्तात्रय काळे, हनुमंत ताठे, बापूसाहेब कदम, संतोष डोंगरे, दत्ता आबा पाटील, भास्कर जगताप, शेखर बंटी भोसले, प्रसाद कळसे, दीपक येळे, धीरज मामाने, नितीन करंडे, प्रवीण पिसाळ, महेश येडगे, अनिकेत देशमुख, भास्कर घायाळ, समाधान देठे, महादेव मासाळ, बालम मुलाणी, भारत रणदिवे, सुधाकर फाटे, संदीप माने, शरीफ शेख, अनिल नागटिळक, दादासो घायाळ, लखन माने, राहुल गावडे, पांडुरंग वाडेकर, पांडुरंग करकमकर, आकाश आटकळे अण्णासो फाटे, सुरज राठी, संभाजी कुर, दत्तात्रय शिंदे, वैभव ननवरे, प्रवीण पिसाळ, राजेंद्र हुंडेकरी, जगन्नाथ जाधव, शिवाजी पवार, बाळासाहेब जाधव, आमीन शेख, संभाजी पाटील, आतिक मुलाणी, बापूसो गोडसे, सदा मस्के, परमेश्वर पाटील, हनुमंत ताटे, विष्णू भूसे, किसन पवार, उमेश खताळ, सुनील रणदिवे, सज्जन जाधव, प्राजक्ता बेणारे, जयश्री क्षीरसागर, ज्योती जोशी, सुजाता वगैरे आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# हळदी-कुंकूच्या निमित्ताने महिलांना मुक्त व्यासपीठ

## नाना-भैय्या युवा मंचतर्फे आयोजित कार्यक्रमास महिलांची उत्स्फूर्त हजेरी

सुराज्य/टेंभुर्णी

दैनंदिन कामातून टेंभुर्णी शहरातील महिलांना स्वत:साठी वेळ मिळावा यासाठी नाना-भैय्या युवा मंचच्यावतीने घेण्यात आलेल्या दोन दिवसीय हळदी-कुंकू कार्यक्रमात साधारण ५ हजार हून अधिक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमात महिलांना त्यांचे कलाविष्कार दाखवण्यासाठी मुक्त व्यासपीठ मिळाले.

कार्यक्रमातून मनोरंजनाबरोबर महिलांच्या सुप्त कलागुणांना, कौशल्याला वाव मिळावा यासाठीच ''हळदी कुंकू व संगीत रंजनी व मनोरंजक खेळ'' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास प्रमुख उद्घाटक म्हणून जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांच्या सुविद्य पत्नी प्रणिता शिंदे यांची उपस्थिती लाभली. त्यांनी असेच महिलांसाठी चांगले कार्यक्रम देशमुख परिवाराकडून घेण्यात यावे. या कार्यक्रमातून महिलांचा समाजात आत्मविश्वास वाढतो, असे सांगितले. यावेळी टेंभुर्णी शहरातील महिलांनी अनेक मनोरंजक खेळ खेळत पैठणी जिंकल्या. कार्यक्रमात लकी ड्रॉ कुपन ठेवले होते. कुपनद्वारे भाग्यवान विजेत्यांना १ एलईडी ४२ इंच टिव्ही, १० मिक्सर व १० पैठणी साड्या येत्या १६ रोजी सकाळी १० वाजता सुरज देशमुख या फेसबुक पेजच्या लाईव्हद्वारे लकी ड्रॉ कुपन काढून वितरण करण्यात येणार असल्याचे रावसाहेब देशमुख यांनी सांगितले. कार्यक्रमानिमित्त पहिल्या दिवशी गायक मोहम्मद अयाज यांचा संगीत रजनी व दुसऱ्या दिवशी सातारा येथील विरेंद्र केंजळे यांचा साज हा कार्यक्रम झाला.




#### महिलांना एकमेकींचा आधार व्हावा हीच भूमिका

टेंभुर्णी शहरात नव्याने आलेल्या महिला व जुन्या महिला यांची या कार्यक्रमाच्या माध्यमातून ओळख व्हावी. त्यांना समाजात वावरत असताना आपण कोणी परके नसून एकमेकींचा आधार असल्याची भावना असावी असा या कार्यक्रमाचा उद्देश होता. हे गावच आपले कुटुंब आहे, या गावातील सदस्य या नात्याने सर्व महिलांची एकमेंकीसोबत ओळख असावी. यातून समाजात त्यांना गुण्यागोविंदाने राहाता यावे, म्हणूनच कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे संकल्पक सुरज देशमुख यांनी सांगितले.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेला सुरुवात

## एक हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

सुराज्य/टेंभुर्णी

जिल्हा परिषदेतील समाजकल्याण विभागाच्यावतीने आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेला सोलापुरातील नेहरूनगर येथील श्री शिवाजी अध्यापक विद्यालयाच्या मैदानावर सुरुवात झाली. दोन दिवस चालणाऱ्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धेसाठी जिल्ह्यातील ५१ दिव्यांग शाळांमधील मतिमंद, कर्णबधीर, मूकबधीर, अस्थिव्यंग व अंध प्रवर्गातील एक हजार विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मनीषा वाकडे यांच्या हस्ते झाले. रोहिदास वाघमारे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी सुनील खमितकर, अभियंता संतोष कुलकर्णी, नरेंद्र खराडे, सामाजिक कार्यकर्ता सच्चिदानंद बांगर, नॅब संस्थेचे सचिव शशीभूषण यलगुलवार, संत दामाजी अपंग शिक्षण मंडळाचे सचिव चित्रसेन पाथरुट, समाज कल्याण विभागाचे कार्यालय अधीक्षक विलास शिंगाडे, शशि ढेकळे उपस्थित होते.

स्पर्धेमध्ये २५ मीटर धावणे, ५० मीटर धावणे, १०० मीटर धावणे, २०० मीटर धावणे, ४०० मीटर धावणे व ४ बाय १०० रिले, गोळाफेक, लांब उडी इत्यादी क्रीडा स्पर्धा झाल्या. नागपूर येथील राज्यस्तरीय स्पेशल ऑलिम्पिक स्पर्धेत सुवर्णपदक विजेते एन. के. अहमद, बाली चामना (दोघेही मुक्ताई मतिमंद मुलांचे बालगृह, लवंगी), सचिन काळे व महादेव काळे (दोघेही मतिमंद शाळा अगळगाव) यांचा सत्कार करण्यात आला.

दत्ता मोकाशी, कमलाकर तिकटे यांनी सूत्रसंचालन केले. रोहन भालेराव व रामदास कुंडगीरे या विशेष शिक्षकांनी सांकेतिक भाषेत मूकबधीर व कर्णबधिर विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे समालोचन केले.

रेडक्रॉस बधीर-मुक विद्यालय बार्शी या शाळेतील विद्यार्थी करण चोरमुले याने खेळाडूंना शपथ दिली.




# माळशिरस विधानसभा क्षेत्रात 'नमो चषक' चे आयोजन

सुराज्य/अकलूज

भाजपच्यावतीने नमो चषक या राज्यस्तरीय कला क्रीडा आणि सांस्कृतिक महोत्सव स्पर्धेचे आयोजन माळशिरसमध्ये केले होते.

एकांकिका, वक्तृत्व स्पर्धा आदी स्पर्धा झाल्या. खेळाडू व कलाकारांना एक चांगले व्यासपीठ निर्माण झाल्याचे भाजपचे संघटन मंत्री धैर्यशील मोहिते-पाटील यांनी सांगितले.

यावेळी माळशिरस तालुका उपाध्यक्ष अमरसिंह माने देशमुख, भाजयुमोर्चा संयोजक सुरज मस्के, डॉ. विश्वनाथ आवड, डॉ. छाया भिसे, डॉ. जनार्दन परकाळे, डॉ. अपर्णा कुचेकर, सुनील कांबळे, अमित पुंज, प्रा. धीरज गुरव, मनोज जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

#### स्पर्धेचा निकाल

वक्तृत्व-शालेय गट-श्रीजा पत्की, ध्रुव देवकाते, रूद्र खंडागळे, मेहरून मुलाणी व संस्कृती शेंडगे. खुला गट-रोहित देशमुख व नागनाथ साळवे प्रथम, रोहन कवडे व नेहा माने द्वितीय, रोहित माने व माधुरी वाघमोडे तृतीय. **समूहनृत्य** - प्रथम नटराज ग्रुप, प्रोत्साहनपर विद्यासागर क्लासेस. **वैयक्तिक नृत्य** - प्रथम सच्चिदानंद नारायणकर, रिक्तम समंता, द्वितीय माधवी हिवरे, त्रिशा शिंदे, तृतीय वेदश्री पोरे, धैर्यलक्ष्मी एकतपुरे व कामिल नदाफ. **एकांकिका** - प्रथम क्रमांक -उकळी, द्वितीय क्रमांक-चिमटा यांनी पटकाविला तर उत्कृष्ट स्त्री अभिनय दुर्गा गायकवाड, उत्कृष्ट पुरूष अभिनय कृष्णा कांबळे.

### कुंभारी पारधी कॅम्प हल्ला प्रकरणी आरोपींना अटक करा

**सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील पारधी कॅम्पमधील पारधी समाज बांधवांवरील हल्ला प्रकरणातील १७ पैकी ५ आरोपींना अटक केली आहे.

राहिलेल्या सर्व आरोपींनाही तत्काळ अटक करावी, अशी मागणी जय कालिका आदिवासी पारधी समाज सामाजिक संस्थेच्यावतीने अध्यक्ष महेश काळे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. पत्रकार परिषदेस मनोज काळे, पार्वती काळे, गोपाळ काळे, चंदा काळे, सुरज चव्हाण, दत्ता चव्हाण आदी उपस्थित होते.

# पंढरपूर मॅरेथॉनमध्ये आबालवृद्धांचा उत्साह

## खा. ओमराजे निंबाळकरही धावपटूंसोबत धावले

सुराज्य/पंढरपूर

यशस्वी आयोजनाची परंपरा कायम राखत अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि अबालवृद्धांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात पंढरपूर मॅरेथॉन झाली. हजारो नागरिकांनी स्वच्छ पंढरपूर, सुंदर पंढरपूर, सुद्दढ पंढरपूर हे ब्रीद घेऊन या स्पर्धेत सहभाग नोंदवला.

अगदी ६ वर्षांपासून ते साठी पार केलेल्या ज्येष्ठ नागरिकांसह प्रतिथयश मान्यवरही सहभागी झाले होते. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर यांनीही २१ किलोमीटचा टप्पा धावत पूर्ण केला. विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील, डॉ. प्रशांत निकम, प्रांताधिकारी गजानन गुरव, विश्वंभर पाटील, डॉ. बायगुडे, किरण घाडगे उपस्थित होते.

दरवर्षी आयोजित होणाऱ्या या स्पर्धेमधील सहभाग सातत्याने वाढताना दिसत आहे.



या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विशेषतः युवक काही महिने आधीपासून तयारी सुरू करतात. पहाटे अनेक युवकांचे युवतींचे ग्रुप आपण पंढरपूरमध्ये पाळताना पाहू शकतो. आता ही केवळ एक स्पर्धा राहिली नसून आरोग्याविषयी जनजागृतीचे अभियान झाले आहे. सहभागी स्पर्धकांना अल्पोपहार, टी शर्ट, मेडल आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी भारत ढोबळे, बालाजी शिंदे, विश्वभर पाटील, डॉ. मंदार सोनवणे, रेखा चंद्रराव, महेश भोसले, डॉ. संजयकुमार सरडे, डॉ. आशिष शहापूरे, डॉ. चंद्रकांत मगर, डॉ. संगीता पाटील, किरण घाडगे, भगवंत बहिरट, दिलीप कोरके, गणेश बागल, राजन थोरात, जयलक्ष्मी माने, माधुरी माने, रनर्स असो.च्या सदस्यांनी परिश्रम घेतले. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष यांनी मॅरेथॉन संपल्यानंतर स्वतः साफसफाई केली.

**स्पर्धेचा निकाल** : १० किलोमीटर ओपन गट : अजित लवटे (३२ मिनिट २ सेकंद), अमोल नागणे (३२ मिनिट ५३ सेकंद), निशांत सावंत (३३ मिनिट २५ सेकंद) महिला गट-आर्या काळेल (३८ मिनिट ३८ सेकंद), वैष्णवी सावंत (३८ मिनिट ५१ सेकंद), योगिनी साळुंखे (३९ मिनिट ३७ सेकंद). **२१ किलोमीटर ओपन पुरुष** - अंकुश हाके (२ तास ८ मिनिट ५० सेकंद), विशाल कांबीरे (१ तास ९ मिनिट २५ सेकंद). महिला गट साक्षी जेडाल (१ तास २० मिनिट ६ सेकंद), अर्चना जाधव (१ तास २३ मिनिट ८ सेकंद), आकांक्षा शेलार (१ तास २४ मिनिट ८ सेकंद)

अस्सल सोलापुरी सुराज्य सोलापूर Classified

#### भाड्याने देणे

भवानी पेठ हनुमान नगर, कोळेकर पिठाची गिरणी नवीन बांधलेल्या खोल्या भाड्याने देणे आहे. मो.९२८४३५१९९२ (६२२४)

#### वर-वधू विषयक

वधु -२५, ५.३ गोरी, १२ वी, हिंदू-धनगर समाज, वडील नाही. आई-मुलगी शिवणकाम करते. गरीब घरातील मुलीकरीता सर्वजातीय मेहनती, कष्टाळू वर चालेल. मो. ७५१७०४९१७३ / ८४२११६८८२६ (८२२४)

**निवेदन :** या अंकात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आवाहनाच्या सत्यतेबाबत 'सुराज्य' हमी घेऊ शकत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

# हिंदू खाटीक समाजातर्फे आक्रोश मोर्चा

सुराज्य/नातेपुते

वलांडी (ता. देवनी) जि. लातूर येथील पीडित कुटुंबियास न्याय मिळावा, आरोपीस फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी नातेपुते येथे हिंदू खाटीक मागासवर्गीय सामाजिक संस्थेच्यावतीने निषेध आक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते. मोर्चा संपूर्ण नातेपुते शहरातून काढण्यात आला. हिंदू खाटीक समाज बांधवांशिवाय इतर समाजातील महिला, पुरुष आणि युवक युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकात या जनआक्रोश मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत झाले. सभेनंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे, गाव कामगार तलाठी प्रभाकर उन्हाळे, मंडलाधिकारी लोखंडे यांना निवेदन देण्यात आले.

वलांडी येथील अत्यंत गरीब मागासवर्गीय अनुसूचित जातीतील हिंदू खाटीक कुटुंबातील लहान मुलीवर निर्दयी आरोपीने अत्याचार केला आहे. त्याबाबतचा गुन्हा २५ जानेवारी रोजी दाखल आहे. पीडित कुटुंबियांचा उदरनिर्वाह विधवा आईवरच आहे, जी मोलमजुरी करून उदरनिर्वाह करते. आरोपीचे घर समोर असल्याने पीडितेच्या कुटुंबाची सोय इतरत्र करावी, आरोपीस कठोर शिक्षा व्हावी, निकाल लागेपर्यंत आरोपीला व कुटुंबियांना गाव बंदी करावी, आदी मागण्या करण्यात आल्या. निवेदनाच्या प्रती राज्य शासन व वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवल्या आहेत. यावेळी सचिन शिंदे, राहुल पद्मन यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला.

#### महिलांनी दुर्गा बनण्याची गरज

लातूरमधील वलांडी येथील घडलेली घटना संताप जनक आहेच. परंतु ती घटना धोक्याचा इशारा आहे. यातील जिहादी मानसिकता ओळखली पाहिजे. उन्मत्त महिषासुरांचे मर्दन करण्यासाठी प्रसंगी महिलांनी दुर्गाही बनले पाहिजे.

**- सचिन शिंदे, भाजप जिल्हा सचिव.**



## संक्षिप्त वृत्त

### वडापूर-सिद्धापूर बॅरेजेसचे काम लवकर सुरु करा : सुभाष पाटील



**सोलापूर** : वडापूर (ता.द.सोलापूर) येथील भीमा नदीवरील वडापूर-सिद्धापूर बॅरेजेसचे काम मंजूर आहे. यासाठी निधीही मंजूर झाल्याने या कामाची निविदा लवकरात लवकर काढून कामास सुरुवात करावी अशा आशयाचे निवेदन दक्षिण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट)चे अध्यक्ष सुभाष पाटील यांनी शनिवारी उपमुख्यमंत्री अजित दादा यांना दिल. काम पूर्ण झाल्यानंतर मंगळवेढा, मोहोळ, व दक्षिण सोलापूर या तीन तालुक्यातील भीमा नदीकाठावरील गावातील हजारो एकर जमिनीच्या सिंचनव पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे. शनिवारी उपमुख्यमंत्री अजित पवार सोलापूर जिल्हा दौऱ्यावर असताना जामगुंडी मंगल कार्यालयात सुभाष पाटील, जकराया शुगरचे चेअरमन जाधव, दामाजी कारखान्याचे संचालक दयानंद सोनगे, रफिक पटेल, संतोष सोनगे, विंचूर सरपंच बाळासाहेब पाटील, कसबे, बी.एन. पाटील, तानाजी कदम, गौरपा पूजारी, मलकरी पूजारी, विकास गुंड, राहुल चव्हाण, बाळासाहेब गरड, औदू पूजारी, लक्ष्मण पूजारी आदी उपस्थित होते.



### वकील सुरक्षा कायद्यासाठी पंढरपुरमध्ये वकिलांकडून तहसीलदारांना निवेदन

**पंढरपूर** : राज्यात वकिलांवर हल्ले होऊ लागले आहेत. म्हणून शासनाने वकील सुरक्षा कायदा लागू करावा, अशी मागणी पंढरपुरातील वकील संघटनेच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे. सोमवारी पंढरपुरातील वकिलांनी तहसील कार्यालयात येऊन राहुरी येथे आढाव वकील दांपत्याचे अपहरण करून खून प्रकरणाचा निषेध केला. पंढरपुरातील वकील विलास शेळके यांना एका विरोधी पक्षकाराने न्यायालयात शिवीगाळ केली. यामुळे शासनाने वकील सुरक्षा कायदा लागू करावा, अशी मागणी केली आहे. याबाबतचे निवेदन वकील संघटनेचे अध्यक्ष अर्जुन पाटील यांनी तहसीलदारांना दिले. वकील सुरक्षा कायदा लागू करण्यात यावा, अशी मागणी गेल्या अनेक वर्षापासून करण्यात येत आहे. मात्र याकडे शासन दुर्लक्ष करत आहे, असा आरोप करण्यात आला. यावेळी पंढरपुरातील अनेक वकील उपस्थित होते.



### रामायणाची चेष्टा करणाऱ्यांचा निषेध करत कारवाईची मागणी

मोहोळ : करोडो देशवासीयांचे श्रद्धास्थान प्रभू श्रीराम व सीतामाई तसेच रामायणाविषयी अर्वाच्य उदगार काढून चेष्टा करणाऱ्यांचा जाहीर निषेध करत कारवाइची मागणी भाजप जिल्हा सहसंयोजक प्रज्ञावंत आघाडी अविनाश पांढरे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत ललीत कला केंद्रात सीतामाई, प्रभू श्रीराम श्री लक्ष्मण आदींच्या भूमिका करणारे कलाकार सर्वांची टिंगल टवाळी होईल अशा प्रकारे अर्वाच्य भाषेत निंदाजनक सादरीकरण करत होते. गैरवर्तन करणारे कथालेखक, कलाकार नाट्य दिग्दर्शक, विद्यार्थी, डॉ प्रविण भोळे, लेखक भावेश पाटील,जय पेडणेकर आदींवर कारवाई करावी. डॉ भोळे यांची बडतर्फी करावी. सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करून कारवाई करावी आदी मागण्या करण्यात आल्या. निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांना पाठवले आहे. मोहोळचे निवासी नायब तहसिलदार धाईंजे यांनाही दिल्याचे सांगण्यात आले. निवेदनावर अविनाश पांढरे, संजिव खिलारे, माधव देशमुख, प्रकाश काळे, महेश सोवनी, विलास म्हमाणे, मच्छिंद्र गाडे , सोमनाथ व्यवहारे, सुशिलकुमार मोटे, प्रमोद जगताप यांच्या सह्या आहेत.



खा.सुनिल तटकरे व कुटूंबियांचा देवस्थानमध्ये सत्कार करताना महेश इंगळे दिसत आहेत.

### वटवृक्ष मंदिर समितीच्या कार्यपद्धतीने भाविकांचे समाधान : खा.तटकरे

**अक्कलकोट** : समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी स्वतः आध्यात्मिक जीवनशैली आत्मसात करून स्वामी सेवेत जीवन अर्पण केले आहे. उत्तम नियोजन करणाऱ्या वटवृक्ष मंदिर समितीच्या कार्यपद्धतीने भाविकांमध्ये समाधानाची भावना असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित गट) प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सांगितले. नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटूंब भेट देऊन दर्शन घेतले. या प्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी तटकरे व कुटूंबियांचा सन्मान केला. ९शिवकुमार स्वामी, आत्माराम घाटगे, महेश गोगी, संजय पवार, श्रीशैल गवंडी, सागर गोंडाळ, प्रसाद सोनार, स्वामीनाथ लोणारी, श्रीकांत मलवे, वैभव जाधव, चंद्रकांत कवटगी उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्ये आंबेडकरी जनतेचा विशाल जनाक्रोश महामोर्चा

**ऐतिहासिक गर्दी, २५ हजारांहून अधिक आंबेडकरी समाज उपस्थित**

सुराज्य/अक्कलकोट



अक्कलकोटमध्ये सोमवार दि. ५ फेब्रुवारी रोजी आंबेडकरी जनतेचा विशाल जनाक्रोश महामोर्चा काढण्यात आला. आंबेडकरी समाजासह बहुजन समाजातील जवळपास २५ हजाराहून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला.

अक्कलकोट शहरातील भीमनगर येथून दुपारी १२.३० वाजता मोर्चा सुरू झाला. राजे फत्तेसिंह चौक , मेन रोड , कापड बाजार पेठ , कारंजा चौक, विजय कामगार चौक , बस स्थानक मार्गे एवन चौका पर्यंत काढण्यात आला. शहर व ग्रामीण भागातील मागासवर्गीय बांधवांवर मोठ्या प्रमाणात होत असलेला अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी हा मोर्चा काढला होता. मोर्चाचा समारोप एवं चौक येथे जाहीर सभेमध्ये झाला. यावेळी माजी नगरसेवक उत्तम गायकवाड रिपाइं आठवले गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, अमर शिरसाठ, विकी चौधरी, विठ्ठल अरेनवरू, अजय मुकणार ,संदीप मडीखांबे,शिलामणी बनसोडे, चंद्रकांत इंगळे, सिध्दार्थ गायकवाड, सचिन बनसोडे तुकाराम दुपारगुडे, राम सोनकांबळे, राहुल रूही, सागर सोनकांबळे, बाबूराव बनसोडे, यशवंत नडगम आर्दीच्या उपस्थितीमध्ये जाहीर सभा पार पडली. उत्तम गायकवाड, अविनाश मडीखांबे, चंद्रशेखर मडीखांबे विठ्ठल आरेनवरू, अजय मुकणात, विकी चौधरी,सागर सोनकांबळे ,सुहानी मडीखांबे आर्दीनी मार्गदर्शन केले.

विशाल जनाक्रोश मोर्चामध्ये अक्कलकोट तालुक्यातील दुधनी,मैंदर्गी, जेऊर, वागदरी, हन्नूर, चपळगाव, दहिटणे, कुरनूर, नागणसूर, करजगी, हसापूर, सलगर, बागेहळी, कर्जाळ आदी गावातून तसेच मुंबई, पुणेतून रहिवासी आले होते. सर्वच पक्षांचे नेते काळा पोशाख घालून उपस्थित होते. मोर्चात शासनाविरोधात प्रचंड घोषणाबाजी झाली. मोर्चा बस स्थानक परिसरात आल्यानंतर अक्कलकोट शहर रिक्षा चालक मालक संघटनेच्या वतीने मोर्चातील नागरिकांना केळी, पाण्याची बाटली व चिवडा यांचे वाटप करण्यात आले. आभार शिलामणी बनसोडे यांनी मानले.

**विटंबना करणाऱ्या आरोपीना तात्काळ फाशीची मागणी**

यावेळी कलबुर्गी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या आरोपीना तात्काळ फाशी द्या.अक्कलकोट शहर व तालुक्यात वाढत असलेल्या जातीवादी प्रवृत्तींना वेळीच आवर घाला अशी मागणी केली. नेतेमंडळींच्याहस्ते तहसील प्रशासन व पोलीस प्रशासनास निवेदन देण्यात आले.

## यशवंत बौद्ध विहारास श्रीलंकेतील भिक्खूंची भेट

सुराज्य/माळीनगर



माळीनगर येथील यशवंत आंबेडकर बुद्धविहारला श्रीलंकेतील बौद्ध भिक्खू भंते कृष्णप्रिया व भंते गायनंद यांनी भेट दिली. यावेळी अन्य मान्यवर.

माळशिरस तालुक्यातील माळीनगर येथील यशवंत आंबेडकर बुद्धविहारला श्रीलंकेतील बौद्ध भिक्खू भंते कृष्णप्रिया व भंते गायनंद यांनी सदिच्छा भेट दिली.

माळीनगर येथील रहिवासी रविंद्र ननवरे यांच्या घरी कार्यक्रमा निमित्त त्यांना आमंत्रित केले होते. यावेळी भारतातील बौद्ध धम्म अनुसरण्याची पद्धत आणि येथील बौद्ध विहार पाहण्यासाठी ते आले होते. त्यांच्याहस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यशवंत बुद्धविहार संस्थेच्यावतीने त्यांचे स्वागत केले.

यावेळी अशोक लोंढे, अमोल जगताप, किरण कीर्ते, अशोक कांबळे, मधुकर ओव्हाळ, अभिमान जगताप, सुशांता जगताप,सचिन कांबळे, अजित नाईकनवरे, अरुण सोनवणे, रवीद्र ननवरे, एम.वाय. जगताप उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोपान चंदनशिवे होते. सूत्रसंचालन श्रीमंत माने यांनी तर आभार संजय तळवळकर यांनी मानले.

## भाऊसाहेब गोसावी यांच्या आश्वासनानंतर बलभीम जाधव यांचे उपोषण मागे

सुराज्य/वेळापूर

**कोट अवैध धंदे करणाऱ्यांवर कडक कारवाई करणार**

वेळापुर पोलिस स्टेशन अंर्तगत येणाऱ्या गावांमध्ये चोरुन अवैध, बेकायदेशीर धंदे करणाऱ्यांना सोडणार नाही, त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल

– **भाऊसाहेब गोसावी** प्रभारी अधिकारी वेळापूर पोलिस स्टेशन

मळोली (ता.माळशिरस) येथील भाजप तालुका उपाध्यक्ष बलभीम जाधव यांनी मळोली मधील बेकायदेशीर दारू विक्री ताबडतोब बंद करावी यासाठी उपोषणाचा इशारा दिला होता. याबाबत वेळापूर पोलीस स्टेशनचे नूतन प्रभारी अधिकारी भाऊसाहेब गोसावी यांनी आश्वासन घेतल्यावर उपोषण माघारी घेतले आहे.

गोसावी यांनी मळोली गावात ग्रामस्थांची बैठक घेतली. अवैध दारू विक्री विरोधात पोलिसांनी चालू केलेली कारवाई ,दारू विक्रेत्याचे विरोध दिलेले प्रस्ताव व भविष्यात अवैध दारू विक्री होऊ देणार नाही असा गोसावी यांनी शब्द दिला. द त्यानंतर पोलीस प्रशासनाच्या विनंतीस मान देऊन बलभीम जाधव यांनी उपोषण तात्पुरते मागे घेतले असले तरीही अवैध दारू विक्री बाबत माझा लढा चालूच राहील असे बलभीम जाधव यांनी सांगितले.

## पिलीव परिसरात ऊसतोडणीसाठी पैशाची मागणी

**ऊसतोड कामगार, कारखाना यांच्या संगनमताने लुट**

सुराज्य/पिलीव



उस उत्पादक शेतकरी चिंतेत असुन आपला ऊस लवकर जावा यासाठी तो प्रयत्नशील असतानाच याचा फायदा मात्र ऊसतोडणी मालक ,मुकादम आहेत.ते ऊस तोडणयासाठी एकरी तब्बल पाच हजार रुपयाची मागणी करीत आहेत.

महाराष्ट्रासह सोलापूर जिल्हयात यंदा पाऊसमान अतिशय कमी झाला आहे यामुळे दरवर्षी प्रमाणे ऊसाचे क्षेत्र नाही यंदाचा सिझन जवळपास महीना पंधरा दिवसावर आला आहे. सध्या वरचेवर ऊन वाढु लागले आहे तसेच पाणी कमी होऊ लागेल यामुळे उस उत्पादकांच्या चिंतेत भर पडली आहे.

दुसरीकडे उसतोडणी करणाऱ्या टोळ्याही लुटत आहेत. तोडणीसाठी पैसे तर मागतच आहेत. शिवाय संपूर्ण वाडेसुद्धा टोळीलाच मागत आहेत. वरुन ड्रायव्हरला डबा, प्रत्येक खेपेला दोन - तिनशे रुपये ,तसेच टकटर फसला तर जेसीबी मालकाने लावायचा त्याचे पैसे सुद्धा मालकानेच द्यायचे. संपूर्ण टोळीला प्रत्येकी किलो किंवा अर्धा किलो ने चिकन द्यायचे याचा सगळा खर्च जर काढला तर जवळपास दहा हजाराच्यावर खर्च येतो मग ऊस ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कसे परवडणार हा गंभीर विषय आहे.


सध्या तर टोळी उन्हात दम काढीत नाही त्यामुळे ऊस पेटवावा लागतो आहे मुकादम म्हणत आहेत आणि ऊस पेटविला की ऊसाचा दर प्रती टन २५०-३०० रुपयांनी कमी दिला जातो.या सगळयात शेतकऱ्यांना ऊस जाताना सुद्धा दुसऱ्या कडुन पैसे व्याजाने घेऊन खर्च करावा लागतो आणी मग महीनाभराने बिल आल्यावर सावकाराकडून घेतलेले पैसे दयावे लागतात. शासनाने यावर कुठेतरी तोडगा काढणे आवश्यक आहे.

## हणमंतराव पाटील यांचे निधन

सुराज्य/अक्कलकोट



तांबोळे तीर्थ (ता. द. सोलापूर) येथील माजी पोलीस पाटील हणमंतराव निलप्पा पाटील यांचे अल्प आजाराने निधन झाले. मत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते. तंटामुक्त समिती, श्री रामलिंगेश्वर देवस्थान पंच कमिटी सदस्य,शालेय समिती अध्यक्ष अशा विविध समित्यावर काम केले होते. त्यांची अंत्ययात्रा मंगळवार दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता राहत्या घरातून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुना,नातवंडे असा परिवार आहे.



विजय खेळाडूंसोबत आ. जगन्नाथ शिंदे, राष्ट्रीय अध्यक्ष रवींद्र चोथवे, मुख्य प्रशिक्षक उमेश शिंदे, प्रशांत गायकवाड.

## साउथ आशियाई हापकिडो बॉक्सिंग स्पर्धेत सोलापूरची विजयी सुरुवात

सुराज्य/मोडनिंब

पुणे बालेवाडी येथे सुरू असलेल्या साउथ आशियाई हापकिडो बॉक्सिंग स्पर्धेत सोलापूर जिल्ह्याची विजयी सुरुवात झाली आहे. आलिशा मुलानी, श्रीपाली दबडे, ओमकार त्रिंबके, श्रेयस मोडेकर यांनी सुवर्णपदक पटकावित भारताचे नाव उंचावले. स्पर्धेत नेपाळ, भूतान, बांगलादेश, श्रीलंका या देशांनी सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्घाटन आमदार तथा साउथ एशिया असोसिएशनचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांनी केले. यावेळी रवींद्र चौधरी, राज वादकर, प्रशांत गायकवाड, उमेश शिंदे उपस्थित होते.



## उपमुख्यमंत्र्याकडून इंद्रभुवन नूतनीकरण कामाचे कौतुक

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महानगरपालिकेची इमारत ही ऐतिहासिक वारसा आहे. वास्तूचे स्मार्ट सिटी योजनेंतर्गत नुकतेच नूतनीकरण केले आहे. नूतनीकरण केलेल्या इंद्रभुवन इमारतीला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भेट दिली व समाधान व्यक्त करून महापालिकेचे कौतुक केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूर महापालिकेच्या इंद्रभुवन इमारतीचे सूक्ष्म निरीक्षण केले. ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारतीमध्ये नूतनीकरणात करण्यात आलेल्या कामांची माहिती घेऊन प्रत्यक्ष कामाची पाहणी केली. या इमारतीचे नूतनीकरण महापालिकेने अत्यंत उत्कृष्टपणे करून घेतल्याबद्दल समाधान व्यक्त करून त्यांनी महापालिकेचे कौतुक केले. तसेच

पाहणी करत असताना त्यांना आढळलेल्या त्रुटीबाबत महापालिका आयुक्तांना सांगून आवश्यक बदल करण्याविषयी सूचना दिल्या. प्रारंभी महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी नूतनीकरण विषय कामकाजाची माहिती दिली. राज्यात बृहन्मुंबई महानगरपालिकेनंतर ऐतिहासिक वारसा असलेली सोलापूर महापालिका ही एकमेव महानगरपालिका असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, उपायुक्त आशिष लोकरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, नगर अभियंता सारिका आकूलवार, उप अभियंता युसुफ मुजावर यांच्यासह महापालिकेचे अन्य अधिकारी उपस्थित होते.

## संत रविदास महाराज जयंतीनिमित्त २४ पासून कुमठ्यात हरिनाम सप्ताह

सुराज्य/सोलापूर

संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीनिमित्त कुमठे येथे २४ फेब्रुवारी ते २ मार्च २०२४ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आल्याची माहिती हभप महादेव महाराज वाघमारे यांनी दिली.

या सप्ताहाचे उदघाटन माजी आमदार दिलीपराव माने यांच्या हस्ते तर ध्वजारोहण नवे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या हस्ते होणार आहे. सप्ताहाचे यंदा २८ वे वर्ष असून या काळात महिला भजनी मंडळांचे भजन आणि प्रवचन होणार आहे. रात्री ८ वाजता हरिकिर्तन होणार आहे.

२४ फेब्रुवारी रोजी उळेगावचे मन्मथ बर्हिमल महाराज तर २५ फेब्रुवारी रोजी सांगोल्यातील युवा कीर्तनकार सोहम खंडागळे यांचे कीर्तन होणार आहे. २६ फेब्रुवारी रोजी कृष्णा पुंड महाराज, २७ फेब्रुवारी रोजी अभिषेक उगाले महाराज, २८ फेब्रुवारी रोजी बाळकृष्ण गडकर महाराज, २९ फेब्रुवारी रोजी ज्ञानेश्वर पठाडे महाराज, १ मार्च रोजी यशोधन साखरे महाराज आणि २ मार्च रोजी सुधाकर इंगळे महाराज यांचे हरिकीर्तन होणार आहे.

## जिल्ह्यातील ९६ ग्रामपंचायती होणार क्षयरोगमुक्त

**जागतिक क्षयरोग दिनी होणार गौरव,: समिती मार्फत होणार पडताळणी**

सुराज्य/सोलापूर

**निवड झालेल्या ग्रामपंचायतींची होणार पडताळणी**

निवड झालेल्या ग्रामपंचायतींना महात्मा गांधी यांचा पुतळा आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करणार आहे. ग्रामपंचायतींची पडताळणी करणार आहे

– **डॉ. मीनाक्षी बनसोडे** (जिल्हा क्षयरोग अधिकारी सोलापूर)

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत टीबीमुक्त ग्रामपंचायत मोहीम राबवण्याबाबत सेंट्रल टीबीमुक्त डिव्हिजनकडील मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्ह्यातील ९६ ग्रामपंचायतींनी क्षयमुक्त होण्यासाठी नामांकन दाखल केले आहे. ही मोहीम १० मार्च २०२४ पर्यंत पूर्ण करून २४ मार्चला जागतिक क्षयरोग दिनानिमित्त या ९६ ग्रामपंचायतींना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे .

**तालुका निहाय सहभागी ग्रामपंचायत**

१) दक्षिण सोलापूर:-०१, २) उत्तर सोलापूर:-०१, ३) अक्कलकोट:-०७, ४) बार्शी :-०८, ५) करमाळा:-१६, ६) माळशिरस :-२३, ७) सांगोला:-०१, ८) मंगळवेढा:-०१, ९) मोहोळ:-१८, १०) माढा:-१३, ११) पंढरपूर:-०७

दरहजारी लोकांमध्ये ३० संशयित क्षयरुग्ण तपासायचे आहेत. टीबी नोटिफिकेशन रेट ० ते १ असणे अपेक्षित आहे. ड्रग सस्पेक्टीबिलिटी रेट हा ६० टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे ६० टक्के आहे. निक्षय पोषण योजनांची अंमलबजावणी आवश्यक आहे. सर्व क्षयरुग्णांना फुड बास्केट १०० टक्के मिळणे गरजेचे आहे. अशा प्रकारे टीबीमुक्त ग्रामपंचायत उपक्रमांतर्गत नामांकनाच्या दाव्यासाठी ६ निर्देशांका नुसार पात्र होणाऱ्या जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची तालुकानिहाय यादी तयार केलेली आहे. अशा एकूण ९६ ग्रामपंचायतींनी टीबीमुक्त होण्यासाठी नामांकन दाखल केले आहेत त्यासाठी जिल्हास्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे.

# सांगोला उपसा सिंचन योजनेला अखेर मंजुरी; खा.निंबाळकर, आ.शहाजीबापूंच्या प्रयत्नांना यश

सुराज्य/सांगोला

**सांगोला तालुक्यातील बहुचर्चित स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन (उजनी उचल पाणी) योजनेस शासन निर्णयाच्या निर्देशानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून मान्यता मिळाली आहे. सोमवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन सांगोला प्रकल्पास सुधारित मान्यता दिली आहे. एकूण ८८४ कोटींच्या निधीस मंजुरी मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली आहे. त्यामुळे सांगोला तालुक्याचा पाणी प्रश्न मिटण्यास मदत होणार आहे. खा. रणजितसिंह निंबाळकर आणि आ. शहाजीबापू पाटील यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.**

## ८८४ कोटींचा प्रकल्प मार्गी लागला,मतदारसंघाचा पाणी प्रश्न मिटणार





युती सरकारच्या काळात १९९७ साली मंजूर झालेली उजनी उपसा सिंचन योजना अनेक वर्षे रखडलेली होती. शिंदे फडणवीस सरकारने दुष्काळी १३ तालुक्यातील रखडलेल्या सिंचन योजना मार्गी लावण्याच्या घेतलेल्या निर्णयापैकी उजनी उपसा सिंचन योजनेला स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना, सांगोला हे नांव देऊन यापूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी मागणी पूर्ण केली आहे. त्यानंतर या योजनेचे भूमिपूजनही करण्यात आले होते. दरम्यान, सोमवारच्या राज्य मंत्रिमंडळ राज्य मंत्रिमंडळ बैठकीत स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन सांगोला प्रकल्पास सुधारित मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे गेल्या २५ वर्षांपासून रखडलेल्या उजनीचे २ टीएमसी उचल पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याने सांगोला तालुक्यातील वंचित असलेल्या १६ गावातील शेतीच्या जिव्हाळ्याचा पाणी प्रश्न मार्गी लागून हा भाग सुजलाम सुफलाम होणार आहे.

योजनेतून दीड टीएमसी पाणी बंदीस्त वितरण नलिकेतून लक्ष्मीनगर, अचकदाणी, बागलवाडी, सोनलवाडी, अजनाळे, य.मंगेवाडी, बंडगरवाडी, चिकमहूद, कटफळ, खवासपूर, जुनी लोटेवाडी, नवी लोटेवाडी व इटकी या १२ गावांना सुमारे ३३ हजार एकर क्षेत्राला व अर्धा टीएमसी पाण्यातून सांगोला शाखा कालवा ५ वरील सुमारे ६ हजार एकर असे एकूण ३९ हजार एकर क्षेत्र नव्याने ओलिताखाली येणार असल्याने दुष्काळी सांगोला तालुका ही ओळख कायमस्वरूपी पुसली जाणार आहे.

### ▪ पाणीदार खासदार हे बिरूद पुन्हा एकदा सिध्द केले

या प्रश्नी खा. रणजितसिंह निंबाळकर आणि आ. शहाजीबापू पाटील यांनी प्रयत्न केले होते. यालाही यश आले आहे. त्यामुळे आता खा. निंबाळकर यांनी माढा, फलटण मतदारसंघाप्रमाणे सांगोला तालुक्याचा पाणी प्रश्नही मिटवला आहे. त्यामुळे जनेतने खा. निंबाळकर यांनी जनतेने दिलेली पाणीदार खासदार ही बिरूदावली पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

### ▪ दिलेला शब्दाची वचनपूर्ती केली : खा. निंबाळकर

यापुढे कुठलीही निवडणूक पाण्यावर लढवणार नाही, असा शब्द आपण जनतेला दिला होता. आज त्याची वचनपूर्ती झाली आहे. आगामी काळात सांगोला तालुका बागायती तालुका म्हणून ओळखला जाईल. आता सांगोल्याची डाळींब आणि द्राक्षाची बाजारपेठ जगभरासाठी खुली होईल, असे खा. निंबाळकर यांनी सांगितले.

### ▪ खा. निंबाळकर, आ. पाटील यांचे अभिनंदन : मुख्यमंत्री

स्व.बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन सांगोला प्रकल्पास सुधारित मान्यता देण्यात आली आहे. एकूण ८८४ कोटींचाच्या निधीस मंजुरी दिली आहे. यासाठी खा.रणजित खा. निंबाळकर आणि आ. शहाजीबापू पाटील यांनी कायम पाठपुरावा केला. त्यांच्यामुळेच यी योजना मार्गी लागल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगत दोघांचे अभिनंदन केले.

# कुमार करजगी दानशूर व्यक्तिमत्व

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते अमृत महोत्सवानिमित्त सत्कार



**सोलापूर** : कामगार नेते कुमार करजगी दानशूर व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी सोलापूर शहर राष्ट्रवादी कार्यालयासाठी मोक्याची जागा दिली आहे. त्यांचे ऋण कधीही विसरणार नाही,असे सांगत त्यांना काही मदत लागेल, तेव्हा सर्वतोपरी मदत करेन अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

सोलापूर शहर राष्ट्रवादी कार्यालयाच्या उद्घाटनानिमित्त जुनी मिल कंपाऊंड येथील मैदानावर आयोजित कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात कुमार करजगी यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पवार बोलत होते. सोलापूर शहर राष्ट्रवादीचे सुसज्ज कार्यालयासाठी शहराध्यक्ष संतोष पवार आणि कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी उत्तम व्यवस्था केली आहे कार्यालयासाठी कुमार करजगी यांनी कोणत्याही प्रकारचे भाडे आकारले नाही. त्यामुळे त्यांच्यासारखे दानशूर व्यक्ती फार कमी असतात, असे सांगत कुमार करजगी यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे,महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, आमदार संजय शिंदे, प्रदेश सरचिटणीस उमेश पाटील,शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान आदी उपस्थित होते.

# दारूच्या नशेत मारहाण; दोघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

दारूच्या नशेत मारहाण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अनिल शिवशंकर भासगीरीकर (वय-३६, रा.तळे हिप्परगा) यांनी जळगाव पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

त्यांच्या फिर्यादीवरून ज्ञानेश्वर राम चव्हाण सीना ज्ञानेश्वर चव्हाण (रा.तळे हिप्परगा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना ३ फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास कुलस्वामिनी हॉटेल समोर घडली.

# जगदाळे मामांनी शैक्षणिक चळवळ पुढे नेली

## डॉ.सदानंद मोरे यांचे जयंतीच्या मुख्य कार्यक्रमात संबोधन



**वीरमाता, वीर पत्नी यांचा सन्मान** : शहिद दिलीप ओझरकर यांच्या वीरपत्नी साधना ओझरकर (पुणे) आणि शहिद तेजस मानकर (वय २३) यांची आई मनीषा मानकर व वडील लहुराज मानकर (सातारा) यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

**बार्शी** : महात्मा फुले, भाऊराव पाटील, बापूजी साळुंखे यांच्यासारख्या महापुरुषांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून निर्माण केलेली शैक्षणिक चळवळ पुढे नेण्याचे काम कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे यांनी केले. बार्शी व परिसराचा विकास घडण्याचे श्रेय मामांच्या शैक्षणिक चळवळीला आहे, असे गौरवोद्गार जेष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी काढले.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जयंतीच्या मुख्य कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षीय मनोगतात खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी महापुरुषांच्या जयंतीच्या निमित्ताने आपण अनावश्यक गोष्टींवर होणारे खर्च टाळून धाराशिवमध्ये त्या खर्चातून मेडिकलच्या नीट परीक्षेची २० विद्यार्थ्यांची फी भरली, असे सांगितले. आमदार राजेंद्र राऊत यांनी प्रतिवर्षी कर्मवीरांच्या जयंतीदिनी संस्था नवनवे संकल्प जाहीर करते. या संकल्पांच्या पूर्ततेसाठी मी लोकप्रतिनिधी या नात्याने संस्थेच्या पाठीशी राहिलो आहे मेडिकल कॉलेज करण्यासाठी मदत करू असे अभिवचन दिले.

माजी मंत्री दिलीप सोपल यांनी आपल्या विद्यार्थी दशेतील कर्मवीरांच्या अनेक आठवणी सांगितल्या. कार्यक्रमाचे स्वागत उपाध्यक्ष नंदकुमार जगदाळे यांनी केले. प्रास्ताविक अध्यक्ष डॉ. बी वाय यादव यांनी केले. संस्थेचा अहवाल सचिव पी.टी. पाटील यांनी सादर केला. जयकुमार शितोळे यांनी परिचय करून दिला. यावेळी शिवाजी कांबळे, रमेश पाटील उपस्थित होते. अरुण देबडवार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन डॉ. रविकांत शिंदे आणि नीता देव यांनी केले.

# रविदास जयंती उत्सवच्या अध्यक्षपदी रविकांत कांबळे

**सोलापूर** : संत रविदास महाराज जयंती उत्सव समिती मंडळाच्या अध्यक्षपदी रविकांत कांबळे यांची निवड झाली.



उत्सव मंडळाची सोलापूर शहर व जिल्ह्याची बैठक व पदाधिकाऱ्यांची निवड रूपा भवानी मंदिर परिसरात झाली. अध्यक्षस्थानी प्रदीप लांबतुरे होते. कार्याध्यक्ष बाळासाहेब कांबळे, उपाध्यक्षपदी गौराबाई कोरे, प्रभावती व्हनसुरे, भाग्यश्री शिंदे, शिवाजी टोणपे, खजिनदार महेश मग्गुमखाने, मिरवणूक प्रमुख दिलीप टोणपे, प्रसिद्धी प्रमुख महेश गाडेकर, सचिव सचिन कासे यांची निवड झाली. संजय शिंदे, अशोक खाडे, राम कबाडे, गणेश तुपसमुद्रे, जॉन फुलारे, अजय राऊत, दत्ता बनसोडे, परशुराम मग्गुमखाने, शिवपुत्र वाघमारे, वसत कांबळे, मलिक हब्बु, शवराप्पा वाघमारे, तानाजी जाधव, बाळासाहेब आळसुंदे, कविता कोडवान, अनिता गवळी, अशोक कटके, संतोष कांबळे, बाळू आळसंदे, चंद्रकांत मुगुमखाने, किरण डांगे, पंकज बनसोडे, सुधाकर कांबळे, सुनील आगवणे, काळे, छायाबाई वाघमारे, विजय गवळी, अशोक सुरवसे, दीपक अहिरे, सर्पराज कांबळे, विशाल टोणपे आदी उपस्थित होते.

# भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कामाला लागावे : आ.कल्याणशेट्टी

**दक्षिण सोलापूर** : भारतीय जनता पार्टी हा पक्ष तळागाळातील जनतेच्या कार्यकर्त्यांचा पक्ष आहे. त्यामुळे येणाऱ्या लोकसभेच्या निवडणुकीला कार्यकर्त्यांनी कामाला लागावे व नरेंद्र मोदी यांनी केलेली विकास कामे जनतेपर्यंत पोहोचवावी असे आवाहन आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथे सोमनाथ गुड्डू पटणे यांनी आयोजित केलेल्या कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी सोमनाथ गुड्डू पटणे यांच्याहस्ते शाल



श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना आयोजक सोमनाथ पटणे म्हणाले आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून विकासापासून वंचित असणाऱ्या बोरामणी जिल्हा परिषद गटात ४५ ते ५० कोटींची विकास कामे झाले असून जिल्ह्यात एक विकासाचा जिल्हा परिषद गट म्हणून बोरामणी जिल्हा परिषद गटाकडे पाहिले जाते व येणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये पक्षाचे कार्यकर्ते आपला लोकसभेचा उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रयत्न करतील असे सांगितले. व आमदार सचिन कल्याण शेट्टी यांनी बोरामणी जिल्हा परिषद गटातील कार्यकर्त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी येणाऱ्या सोलापूर राखीव लोकसभा निवडणुकीसाठी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांना प्राध्यापक विश्रांत गायकवाड यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी करण्यात आली. यावेळी बोरामणी, मुस्ती, संगदरी, कासेगाव, उळे, उळेवाडी, बक्षी हिपरगे, वडजी, वरळेगाव, गंगेवाडी, दोड्डी, तांदुळवाडी, मुळेगाव, मुळेगाव तांडा, वरळेगाव भागातील भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# भारत जाधवांच्या राजीनाम्यावर राष्ट्रवादीच्या गोटात संताप

**अजित पवारांच्या सोलापूर दौऱ्यावेळीच का राजीनामा दिल्याचा सवाल,**

**▪ कार्यकर्त्यांमध्ये जाधवांनी संभ्रम निर्माण केल्याचा आरोप**

सुराज्य/विशेष प्रतिनिधी



**भारत जाधव यांना शहराध्यक्ष पदाचा राजीनामा द्यायचाच होता, तर अजित पवार हे सोलापूर दौऱ्यावर असतानाच का दिला? राजीनामा देण्याला पुढचा मागचा 'मुहूर्त' नव्हता का? असा सवाल शरद पवार राष्ट्रवादी गटातील पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्त्यांकडून जाधव यांना केला जात असून अजित पवार यांच्या दौऱ्या वेळीच राजीनामा देऊन जाधव यांनी शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण केला अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या जात आहेत.**

विशेषत्वे, भारत जाधव यांच्या राजीनामाच्या प्रकरणावरून शरद पवार राष्ट्रवादी गटामध्ये जाधव यांच्या संदर्भात संतापाची धग असून अजित पवार ज्या दिवशी सोलापुरात होते, त्याच दिवशी राजीनामा देण्याच्या पाठीमागे भारत जाधव यांचे काही षडयंत्र होते, का असाही सवाल या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अजित पवार राष्ट्रवादी गटाचे प्रमुख अजित पवार हे शनिवारी दिवसभर सोलापूर दौऱ्यावर होते. विविध मेळावे, बैठका, कार्यक्रम यामधून सोलापुरात ते आपल्या गटाची ताकद अधिक वाढविण्याचा प्रयत्न करत असतानाच्या नेमक्यावेळी शरद पवार राष्ट्रवादी गटाचे शहराध्यक्ष भारत जाधव यांनी पुण्यात जाऊन आपल्याकडील पदाचा राजीनामा दिला.

प्रकृतीच्या कारणावरून आपण राजीनामा देत आहोत, शरद पवार यांच्याच गटात राहून आपण सक्षमपणे काम करणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी भारत जाधव यांचा यादरम्यान राजीनामा तातडीने मंजुरही केला होता. दरम्यान, सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, भारत जाधव यांच्या राजीनामा देण्यावर शरद पवार राष्ट्रवादी गटाचे पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते यांनी आक्षेप लावला आहे. अजित पवार यांच्या सोलापूर दौऱ्यावेळीच राजीनामा देऊन शरद पवार राष्ट्रवादी गटाला 'डॅमेज' करण्याचा प्रयत्न भारत जाधव यांचा होता का किंवा तसे षडयंत्र त्यांना कोणी रचायला लावले होते का असाही मुद्दा आता उपस्थित केला जात आहे. इतकेच नव्हे तर, ऐनवेळी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण करणाऱ्या भारत जाधव यांची राष्ट्रवादी शरद पवार गटामधूनच आता कायमची हकालपट्टी करण्याचा सूर देखील या गटाच्या गोठात असून तशा प्रतिक्रिया ही अनेकांनी व्यक्त केल्या.

भारत जाधव यांचे शहराध्यक्षपदाचे काम चांगले चालू होते. अजित पवार यांच्या दौऱ्या वेळीच नेमकेपणाने त्यांनी राजीनामा दिला यातून शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या सर्वांमध्ये संभ्रम निर्माण झाला. श्री जाधव यांनी ही भूमिका का घेतली? याबद्दल उद्या मंगळवारी आपण त्यांच्याशी बोलणार आहोत. शिवाय श्रेष्ठींना देखील या संदर्भात विचारणार आहोत. जाधव यांनी अजित पवार सोलापुरात असतानाच, तडकाफडकी त्याच दिवशी पुण्यात जाऊन राजीनामा देण्याची गरज नव्हती. हे झाले ते चुकीचे झाले. जाधव यांनी स्वतःच स्वतःची इमेज डॅमेज केली. कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण केला.

**- सुधीर खरटमल, ज्येष्ठ नेते,**
शरद पवार राष्ट्रवादी गट, सोलापूर

अजित पवार यांच्या सोलापूर दौऱ्यावेळीच राजीनामा द्यायचा वगैरे अजिबात ठरलेले नव्हते. पुण्यात तपासणीसाठी गेलो होतो, डॉक्टरांनी ताण घेऊ नका, जीवाला धोका होईल, असे सांगितले. त्यामुळे त्याच दिवशी राजीनामा दिला. राजीनामा आणि अजित पवार यांचा दौरा हा योगायोग झाला. ठरवून काही काही करण्याचे कारण नाही. कार्यकर्त्यांना संभ्रम निर्माण होण्याचे कारण नाही.मागील दोन वर्षांपासून मी श्रेष्ठी शरद पवार यांना राजीनामा घ्या म्हणत होतो. तीव्र हृदयरोग आणि मधुमेह असताना ताण सहन करत मी यापदावर काम करणे अशक्य होते. निवडणुकांचा ताण येणार होता.

**- भारत जाधव, माजी अध्यक्ष,**
शरद पवार राष्ट्रवादी गट, सोलापूर